रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १२७
www.ramprahar.com
शुक्रवार, २४ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## बोगद्यात अडकलेल्या कामगारांचे बचावकार्य युद्धपातळीवर



**उत्तराखंड** : उत्तरकाशीच्या बोगद्यात कामगार अडकून १२ दिवस झाले असून राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एनडीएमए) गुरुवारी (दि. २३) बचाव मोहिमेबाबतची परिस्थिती स्पष्ट केली. एनडीएमएचे सदस्य लेफ्टनंट जनरल (निवृत्त) सय्यद अता हसनैन म्हणाले की, कामगारांना बाहेर काढण्यासाठी कोणतीही स्पष्ट टाईमलाईन दिली जाऊ शकत नाही. ड्रिलिंग करताना काही तांत्रिक अडथळ्यांना तोंड द्यावे लागत आहे. बोगद्याच्या ठिकाणी ४१ रुग्णवाहिका उपस्थित असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच गंभीर अवस्थेतील कामगारांना विमानाने नेण्याची सुविधाही उपलब्ध आहे. बचाव पथक अडकलेल्या कामगारांपासून काही मीटर दूर आहेत. जर सर्व काही ठीक झाले तर हे ऑपरेशन आज रात्री पूर्ण होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## अंतरंग

राज्यातील शाळांमध्ये आता वाचन चळवळ/२
शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक/६
पनवेल, उरणमधील गोशीन रियू कराटेपटूंची चमक/८

# जाहिरातींमुळे पनवेल शहराचे विद्रुपीकरण; मनपाने एशियाड सर्कसची परवानगी केली रद्द

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका हद्दीत अनेक ठिकाणी जाहिराती लावून विद्रुपीकरण केल्यामुळे एशियाड सर्कसला पनवेल महानगरपालिकेने दिलेली परवानगी रद्द करण्यात आली आहे.

महापालिकेच्या परवाना विभागाच्या अधिक्षकांनी तसे लेखी कळविले आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क मधील खांदेश्वर स्टेशनसमोरील कामोठे सेक्टर २७ येथे एशियाड सर्कसला १० नोव्हेंबर रोजी महापालिकेच्या परवाना विभागाने परवानगी दिली




होती, परंतु प्रभाग क मधील कामोठे विभागात विनापरवानगी भिंती, इलेक्ट्रिक डीपी, पत्रा कंपाऊंड व कमानीवर एशियाड सर्कसने त्यांचे जाहिरातीचे पोस्टर, बॅनर लावण्यात आले आहेत.

महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ही बाब उपायुक्त वैभव विधाते यांच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी पोस्टर काढण्यासाठी एशियाड सर्कसच्या व्यवस्थापनाला मुदत दिली. त्या मुदतीत कबूल करूनही त्यांनी पोस्टर न काढल्याने त्यांची परवानगी महापालिकेने रद्द केली आहे.


पनवेल महापालिकेने यापूर्वीही मत्स्य महोत्सवाच्या जाहिराती लावून शहराचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण केल्याबद्दल दंडाची नोटीस देण्यात आली होती. याशिवाय पोलीस प्रशिक्षण अकॅडमीच्या जाहिराती लावणाऱ्यांनाही नोटीस देऊन त्यांच्या जाहिराती काढायला लावल्या होत्या.

# मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड व अंडरपास मंजूर

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई व पनवेल तालुक्यातून जाणाऱ्या मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूने १०३.२१ कोटी रुपयांचा सर्व्हिस रोड व अंडरपास केंद्रीय रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मंजूर केला आहे. यामुळे या परिसरातील विकासाला अधिक चालना मिळणार असून यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा पाठपुरावा कामी आला आहे.



नवी मुंबई व पनवेल तालुक्यातून मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग म्हणजेच दिल्ली-मुंबई कॉरिडॉर हा जेएनपीटीला तथा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे पोहचणार आहे. हा मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग बदलापूरनंतर पनवेल तालुक्यातील शिरवली, चिंध्रण गावाजवळून मोरबे सर्कलपर्यंत आलेला असून त्यापुढे तो महाराष्ट्र शासनाच्या विरार-अलिबाग मल्टीमॉडेल कॉरिडॉरला जोडलेला आहे.

मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग म्हणजेच दिल्ली-मुंबई कॉरिडॉर पनवेल तालुक्यातील मौजे वांगणीतर्फे तळोजे, शिरवली, चिंचवलीतर्फे तळोजे, आंबेतर्फे तळोजे व मोरबे इत्यादी गावातून जातो. या सर्व गावातील रहिवाशांना व विविध प्रकल्पांना दळणवळणाच्या दृष्टीने या द्रुतगती महामार्गाचा फायदा व्हावा, या अनुषंगाने केंद्रीय रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी वडोदरा-मुंबई एक्स्प्रेस वेच्या दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड व अंडरपास तसेच इतर विविध मागण्या केलेल्या होत्या. याबाबत ३० ऑगस्ट २०२१ रोजी ना. नितीन गडकरी यांना पत्र देण्यात आले होते, तसेच आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेटही घेतली होती.

त्याचबरोबर या दोन्ही लोकप्रतिनिधींनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून १६ नोव्हेंबर २०२३ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या खात्यामार्फत अर्थात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली, (एनएमआय) ने मागणी मान्य केली आहे. (पान २ वर..)

## 'डीपफेकप्रकरणी सरकार कठोर कारवाई करणार'

**नवी दिल्ली** : मागील काही दिवसांपासून डीपफेक फोटो, व्हिडिओ आणि ऑडिओच्या वाढत्या प्रकरणाबाबत सरकार सावध झाले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोशल मीडिया कंपन्यांसोबत बैठक घेऊन हे टाळण्यासाठी काही निर्णय घेतले.

केंद्र सरकारने सोशल मीडिया कंपन्यांना कारवाई करून कठोर कायदे करण्यासही सांगितले आहे. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, डीपफेक टाळण्यासाठी सरकार आणि कंपन्या कोणत्या मुद्द्यांवर काम करतील. अशा व्हिडिओंची चौकशी करण्यासाठी काही प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहेत. अशा व्हिडिओंविरोधात लवकरच कायदा करण्यात येईल आणि योग्य तांत्रिक पावले उचलली जातील, अशी माहितीही त्यांनी या वेळी दिली. यासंबंधीचा कोणताही कायदा अद्याप लागू झालेला नाही.

# बा विठ्ठला, राज्यातील जनतेच्या मनोकामना पूर्ण करण्याची ताकद दे

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विठुरायाला साकडे



**पंढरपूर : प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपुरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सपत्निक शासकीय पूजा झाली. नाशिकचे घुगे दाम्पत्य यंदाचे मानाचे वारकरी ठरले.

शासकीय महापूजा झाल्यानंतर मंदिर समितीच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठुराया चरणी, महाराष्ट्रातला प्रत्येक व्यक्ती सुखी झाला पाहिजे हेच विठुरायाकडे मागणे आहे, तसेच सर्वांच्याच मनोकामना पूर्ण करण्याची ताकद त्याने आम्हाला द्यावी, असे साकडे विठुराया चरणी घातले आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वारकरी कुठल्याही परिस्थितीत पंढरीच्या दिशेने चालत राहिले, त्यामुळेच कुठलाही कुकर्मा आमचा हा विचार संपवू शकला नाही. महाराष्ट्र धर्म हा वारकऱ्यांनी जिवंत ठेवला. आधी मंदिराच्या संवर्धनाचे काम झाले पाहिजे, अशी आपली भूमिका होती. त्याप्रमाणे ७५ कोटींच्या कामाच्या पहिल्या टप्प्याचे भूमिपूजन आज झाले आहे. (पान २ वर..)

## निवडक

### पहिल्या महिला न्यायाधीश फातिमा बीवी यांचे निधन



**मुंबई** : सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश फातिमा बीवी यांचे वयाच्या ९६व्या वर्षी गुरुवारी (दि. २३) निधन झाले. ऑक्टोबर १९८९मध्ये त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून त्याची निवड झाली. भारतातून एवढ्या मोठ्या पदावर जाणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. २९ एप्रिल १९९२ रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी तमिळनाडूच्या राज्यपाल म्हणूनदेखील काम पाहिले होते.

### आमदार अपात्रतेसंदर्भात आता मॅरेथॉन सुनावणी

**मुंबई** : आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याप्रकरणी १८ दिवस मॅरेथॉन सुनावणी होणार असल्याचे सांगितले आहे. २८ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर आणि ११ ते २२ डिसेंबर या काळात नियमित सुनावणी घेणार असल्याचे राहुल नार्वेकरांकडून घोषित करण्यात आले आहे.

# विकसित भारत संकल्प यात्रेस रायगडात प्रारंभ

## जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा झेंडा दाखवून रथ मार्गस्थ



**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहचावेत याची खात्री करण्याच्या उद्देशाने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम केंद्र शासनाकडून आखण्यात आली आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने विकसित भारत संकल्प यात्रा योजनेच्या रथाला गुरुवारी (दि. २३) जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले.

या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के आदींसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

शासनाच्या विविध योजनांतर्गत पात्र असलेल्या परंतु लाभ न घेतलेल्या लोकांपर्यंत पोहचणे, माहितीचा प्रसार आणि योजनांबद्दल नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करणे, नागरिकांशी संवाद, यात्रेदरम्यान संभाव्य लाभार्थ्यांची नोंदणी करणे ही विकसित भारत संकल्प यात्रेची मुख्य उद्दिष्टे आहेत. या मोहिमेंतर्गत जिल्हा प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहणार असल्याने प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विकसित भारत संकल्प यात्रा योजनेचा रथ रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पनवेल, खालापूर, रोहा, तळा, श्रीवर्धन, महाड या सात तालुक्यांमध्ये जाणार आहे.

## सर्वोच्च न्यायालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे लोकार्पण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाच्या प्रांगणात घटनाकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्यात येणार आहे. संविधान दिनी रविवारी (दि. २६) राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे. हरियाणातील मानेसर येथे पुतळ्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात भारताचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्यासह भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. सात फूट उंचीच्या या पुतळ्यामध्ये डॉ. आंबेडकर यांनी वकिल पोषाख आणि हातात संविधानाची प्रत धारण केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात समोरच्या हिरवळीवर आणि बागेत डॉ. आंबेडकरांचा पुतळा बसवला जाणार आहे.

# माथेरानची मिनीट्रेन रुळावरून घसरली



**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानचे प्रमुख आकर्षण असलेली मिनीट्रेन बुधवारी (दि. २२) दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास रुळावरून घसरली. या घटनेमुळे माथेरान ते अमन लॉजदरम्यानच्या दोन फेऱ्या रद्द करण्यात आल्या. तब्बल दोन तासांनी ती पुन्हा रुळावर आणण्यात यश आल्याने ती पुन्हा सुरू करण्यात आली.

४ नोव्हेंबरपासून नेरळ ते माथेरान सेवा सुरू झाली. बुधवारी दुपारी ४.०५

### दोन तास खोळंबा

वाजण्याच्या दरम्यान वॉटर पाईप स्थानकानजीक मिनीट्रेनचे इंजिन रुळावरून घसरले. यामुळे प्रवाशांचा हिरमोड झाला.

इंजिन पुन्हा रुळावर आणण्यास दोन तास लागले. त्यानंतर ६ वाजण्याच्या सुमारास ही मिनीट्रेन नेरळकडे रवाना झाली. सध्या मिनीट्रेनच्या मार्गातील स्लीपर्स बदलण्याचे काम सुरू आहे. यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

# धाकटी पंढरीत भाविकांची मांदियाळी

## शेकडो वारकरी व भाविकांनी घेतले पांडुरंगाचे दर्शन





**खोपोली : प्रतिनिधी**

जगत्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीतील धाकटी पंढरीत कार्तिकी शुद्ध एकादशीनिमित्ताने विठ्ठल रूखमाईच्या दर्शानासाठी गुरुवारी (दि. २३) पहाटेपासून भाविकांनी गर्दी केली होती. पहाटे ४.३० वाजता विधिवत महापूजा व महाआरती झाल्यावर भाविकांसाठी मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. दिवसभरात हजारो भाविकांनी विठुरायाचे दर्शन घेतले.

खोपोली नगरपालिका हद्दीतील ताकई गावच्या परिसरात उंच टेकडीवर विठ्ठल रूखमाईचे मंदिर आहे. याठिकाणी संत तुकाराम महाराज मिरचीचा व्यवसाय करण्यासाठी येत असत. परिसरातील काही लोकांनी महाराजांचे पैसे बुडविल्याने त्यांनी पांडुरंगाच्या नावाने बोंबा मारल्या असता साक्षात पांडुरंगाने दर्शन देत बुडालेले पैसे परत मिळवून दिले. त्यामुळेच 'बोंबल्या विठोबा' असे नाव पडले असल्याची आख्यायिका सांगितली जाते. शेकडो वर्षांपासून कार्तिकी एकादशीला येथे यात्र भरते. संपूर्ण जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. एकादशीच्या आदल्या दिवशी भव्य पालखी सोहळा पार पडला.

ताकई गावात घरोघरी पालखीचे दर्शनानंतर रात्री २ वा. च्या दरम्यान पालखी मंदिरात स्थानापन्न झाली. मंदिरात गर्दी न होता भाविकांना दर्शन घेण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी धाकटी पंढरी देवस्थान कमिटीचे अध्यक्ष सुधीर पाटील, सेक्रेटरी नारायण पाटील, सदस्य ॲड. रामदास पाटील, अतुल पाटील, जयवंत पाटील, संदेश पाटील, व्यवस्थापक मारूती पाटील तसेच सर्व सदस्यांनी उत्तम व्यवस्था केली आहे. खोपोली पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनात पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे.

यात्रेनिमित्त खोपोली पालिकेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी पालिकेकडून आरोग्य यंत्रणा, अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवत अन्य आवश्यक विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. कार्तिकी एकादशीपासून सुरू होणारी यात्रा १५ दिवस चालते. या वेळी कोट्यवधींची उलाढाल होऊन शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह होतो.

(छाया : संकेत भोईर)





# पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आभा कार्ड आणि आधार कार्डचेही वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तक्का येथे पनवेल महापालिकेच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांच्या हस्ते झाले.

पनवेल महापालिकेच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिर राबवण्यात येत आहेत. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १च्या वतीने तक्का येथील महापालिकेच्या मराठी शाळेत हे शिबिर घेण्यात आले. या शिबिरावेळी आधार कार्ड आणि आभा कार्डचे वाटपही करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतीक बहिरा, किसान मोर्चाचे रुपेश परदेशी, महेश मोहन राऊळ, हरून शेख, जितू कुटकर यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील शाळांमध्ये आता वाचन चळवळ

## शालेय शिक्षण विभागाची मान्यता



**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात इयत्ता तिसरीच्या ३० टक्केपेक्षा जास्त मुलांना लहान मजकूर, पाचवीपर्यंतच्या ४१ टक्के मुलांना त्यांच्या श्रेणीचा योग्य मजकूर वाचता येत नसल्याचे आढळून आले आहे, मात्र आता हे चित्र बदलण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये वाचन चळवळ राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

विद्यार्थी भाषा नैसर्गिकरित्या शिकतात, मात्र विद्यार्थ्यांनी वाचन जाणीवपूर्वक शिकले पाहिजे. इयत्ता दुसरीमध्ये मुलांना वाचन येणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून वाचन होत नसल्याचे राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे २०२६पर्यंत राज्यातील तिसरीपर्यंतचे प्रत्येक मूल ओघवते वाचन करू शकेल, आठवीपर्यंतचे प्रत्येक मूल शिकण्यासाठी वाचू शकेल हे सुनिश्चित करणारी आनंददायी वाचनाची चळवळ निर्माण करण्याच्या उद्देशाने आता राज्यात वाचन चळवळ राबवली जाणार आहे. या वाचन चळवळीत शालेय शिक्षण विभाग, राज्य सरकार, युनिसेफ, रीड इंडिया आणि प्रथम बुक्स या संस्थांचा सहभाग आहे.

मुलांना वाचनाची सवय लावण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालकांकडून मार्गदर्शक सूचना तयार केल्या जातील. राज्यातील शासनमान्य शाळा आणि खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल, मात्र खासगी शाळांना पुस्तके दिली जाणार नाहीत.

उपक्रमात वर्षभरातील काही तारखा निश्चित करून शाळेत वाचन वर्ग आयोजित केले जातील. त्यात विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण करतील. त्याशिवाय शालेय स्तरावर शाळेच्या वेळापत्रकातच साप्ताहिक दोन वाचन तासिकांचा समावेश करणे, गोष्टींचा रविवार उपक्रमांतर्गत दर शनिवारी ई-पुस्तके उपलब्ध करून देणे, आनंदाचा तास अंतर्गत 'ड्रॉप एव्हरीथिंग अँड रीड' या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या वेळापत्रकात किंवा शाळा सुरू होण्यापूर्वी १५-२० मिनिटे शिक्षक आणि मुलांसाठी कथा पुस्तके वाचण्यासाठी आनंदाचा तास वेळापत्रकात समाविष्ट केला जाईल.

**ब्रँड ॲम्बेसिडरची नियुक्ती**

मुलांना वाचनाच्या संधी उपलब्ध करण्यासाठी लोकसहभाग, मुलांना वाचनाचे महत्त्व समजावणे, मराठी भाषेचा नवीन वाचक वर्ग तयार करणे, मुलांवर चांगले संस्कार करणे, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकांतून रसास्वादाची दृष्टी निर्माण करण्याचा या चळवळीचा उद्देश आहे. या उपक्रमासाठी ब्रँड ॲम्बेसिडरची नियुक्ती केली जाणार आहे.

# निवडणूक आयोगाकडून खासदार राहुल गांधींना कारणे दाखवा नोटीस

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील टीका भोवली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पनवती आणि पाकिट चोर अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची तुलना केल्याने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना निवडणूक आयोगाने गुरुवारी (दि. २३) कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राजस्थानमधील एका निवडणूक रॅलीत राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केले होते. याबाबत भाजपने निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती. भाजपच्या तक्रारीची निवडणूक आयोगाने दखल घेतली असून कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

राहुल गांधींनी पंतप्रधानांची तुलना पाकिटामारशी केली, तसेच पीएम म्हणजे पनवती मोदी अशीही खिल्ली राहुल गांधींनी उडवली होती. पंतप्रधानांनी गेल्या नऊ वर्षांत श्रीमंतांचे १४ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या सूचनेमध्ये एमसीसी तरतुदीचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, असत्य आरोप किंवा विकृतीवर आधारित टीका टाळली पाहिजे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ नुसार पनवतीचा वापर भ्रष्ट व्यवहाराच्या व्याख्येत येतो. तशीच ही आध्यात्मिक निंदा आहे.

कोणत्याही व्यक्तीला पाकिटमार म्हणणे म्हणजे हा केवळ वैयक्तिक हल्लाच नाही तर त्या व्यक्तीचे चारित्र्यहनन करणे होय. पनवती शब्द निषेधार्ह आहे. मॅच हरणे किंवा जिंकणे हे व्यक्तीच्या हातात नसून संघाच्या कामगिरीवर अवलंबून असते. पंतप्रधानांनी ५० हजार कोटी रुपयांची कर्जमाफीही केलेली नाही. सर्व बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली काम करतात. आरबीआय ही एक वैधानिक स्वायत्त संस्था आहे, असे भाजपाने निवडणूक आयोगात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले होते.

मोदी आडनावप्रकरणी झालेल्या कारवाईमुळे राहुल गांधींना खासदारकी गमवावी लागली होती. त्यानंतर त्यांच्यावरील गुन्हे मागे घेण्यात आल्याने त्यांची खासदारकी पुन्हा देण्यात आली. आता पुन्हा पंतप्रधान मोदींच्या चारित्र्याचे हनन केल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने त्यांना नोटीस बजावली आहे.

# भर रस्त्यात मारहाण करून तीन लाखांची जबरी चोरी

**पनवेल : वार्ताहर**

कारचालकाने उसाच्या दांडक्याने मारहाण करून एका तरुणाच्या खिशातील तीन लाख रुपये जबरीने चोरून नेल्याचा प्रकार कळंबोली येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विशाल नामदेव टावरे (वय ३९) यांचा टाईल्स सप्लायरचा व्यवसाय आहे. त्यांनी तीन लाख रुपये पँटच्या खिशात ठेवले होते. ते दुकानात काम करणाऱ्या मुलासोबत दुचाकीने टाईल सॅम्पल घेऊन सायन-पनवेल हायवे मॅकडोनाल्डसमोरील बस स्टॉपजवळ गेले. या वेळी कारचालकाला टाईल्स सॅम्पल पुण्याला द्यायचे आहे, तुम्ही नेणार का व किती रुपये लागतील, असे विचारले. या वेळी त्याने ५०० रुपये सांगितले. त्याला १०० रुपये घ्या, असे बोलले असता कारचालकाने शिवीगाळ केली.

या वेळी विशाल हे मोबाईलमध्ये रस्त्यावरील वाहतुकीची व्हिडीओ शूटिंग करीत असताना त्या कारचालकाने हाताने मारहाण केली. त्यानंतर तुझी तक्रार पोलिसांना करेन, असे बोलून ते फुटपाथ पुढील रसवंतीचे दुकान ओलांडून पेट्रोल पंपाच्या समोरील रस्त्यावर आले. ते चायनीज गाड्यांच्या समोरून कळंबोली सर्कलच्या दिशेने पायी जात असताना पाठीवर जोरात कोणीतरी काहीतरी मारले. त्यांनी मागे पाहिले असता त्या कारचालकाने हातातील उसाच्या दांडकाने मारहाण केली व त्यांच्या दोन्ही खिशातून तीन लाख रुपये काढून घेतले, त्यानंतर तो शिविगाळ करीत निघून गेला. विशाल नामदेव टावरे यांनी या प्रकारानंतर तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली.

# राष्ट्रवादीच्या निर्धार सभास्थळाची ना. आदिती तटकरेंकडून पाहणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतच्या पोलीस मैदानावर राष्ट्रवादी काँग्रेसची निर्धार सभा बुधवारी (दि. २९) होणार आहे. या सभेची पूर्वतयारी कशी झाली आहे, याची पाहणी करण्यासाठी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सभास्थळी येऊन पाहणी करून काही सूचनासुद्धा केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उठाव झाल्यानंतर राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांचे नेतृत्व स्विकारले. सुधाकर घारे यांनी पक्षाचे कार्यालय असावे म्हणून त्यांनी विठ्ठलनगरमध्ये सुसज्ज पक्ष कार्यालय उभारले. या कार्यालयाचा लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे आदी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर पोलीस मैदानात निर्धार सभा होणार आहे. या सभेची पूर्वतयारी कितपत झाली आहे. त्याची पाहणी व माहिती घेण्यासाठी ना. आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांनी पाहणी केली व सूचना केल्या.



या वेळी राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, प्रदेश प्रतिनिधी व शहराध्यक्ष भगवान भोईर, जिल्हा सरचिटणीस ॲड. राजेंद्र निगुडकर, तालुका महिला अध्यक्ष ॲड. रंजना धुळे, प्रकाश पालकर, तालुका युवक अध्यक्ष स्वप्नील पालकर, तालुका उपाध्यक्ष मधुकर घारे, समीर देशमुख, बंडू तुरडे आदी उपस्थित होते.

# ऑनलाईन फसवणूक; दोघांविरोधात गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**




मोबाईल कॉल करून बँकेचे ऑनलाईन ॲक्सेस मिळवून बँक खात्यातून ९० हजार ३०० रुपये स्वतःच्या खात्यात घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

निनाद रवींद्र वेदक हे कामोठे, सेक्टर १० येथे राहत असून, ते घरी असताना त्यांना बँक खात्याला ॲड असलेल्या मोबाईल नंबरवर ९० हजार ३०० रुपये डेबिट झाल्याचा एसएमएस आला. त्यांनी चेक केले असता, कोणताही ओटीपी व कोणतेही ॲप डाऊनलोड केले नसल्याचे समजले. त्या वेळी त्यांनी बँकेला कॉल करून पैसे कपात झाल्याची माहिती दिली व ऑनलाईन डिस्प्युट दाखल केला आहे.

अरुण चौधरी आणि कोरबान मंडल या नावाच्या बँक खातेधारकांनी मोबाईल कोल करून बँकेची ऑनलाईन ॲक्सेस मिळवली व बँक खात्यातून ९० हजार ३०० रुपये स्वतःच्या बँक खात्यात घेऊन फसवणूक केल्याचे उघड झाले. त्यानुसार कामोठे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. अशा प्रकारचे ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत असल्याने नागरिकांनी सतर्क रहावे व फसवणूक झाल्यास त्वरीत तक्रार करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# अलिबागच्या पत्रकारांना अपघात विम्याचे संरक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असोसिएशनच्या माध्यमातून अलिबागमधील २७ पत्रकारांना १० लाखांच्या अपघाती विम्याचे संरक्षण देण्यात आले.

समाजाच्या घडामोडी टिपण्यासाठी धावपळ करणाऱ्या पत्रकारांना आरोग्याच्या दृष्टीने शासनाकडून अपेक्षित लाभ मिळत नाही. त्यात अपघात झाला तर आर्थिक मदतीची टंचाई होते. लोकांना मदत मिळवून देणारा पत्रकार अनेक सोयीसुविधांपासून वंचित राहतो. यामुळेच अलिबाग प्रेस असोसिएशनकडून प्रत्येकी १० लाखांचा अपघाती विमा अलिबाग पोस्ट ऑफिसच्या सहकार्याने हा अपघात विमा काढण्यात आला.

अलिबाग प्रेस असोसिएशनच्या कार्यालयात बुधवारी (दि. २२) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, कार्याध्यक्ष राजन वेलकर, उपाध्यक्ष जितेंद्र शिगवण, खजिनदार हर्षद कशाळकर, सचिव राजेश भोस्तेकर, पोस्टमास्तर गजेंद्र भुसाने, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पाटील, विपणन अधिकारी समीर म्हात्रे व पत्रकार उपस्थीत होते. आयपीपीबी सहाय्यक किरण दानवले, पोस्टमन अनिल दाभेकर व अमोल भटकर यांनी पत्रकारांचा विमा काढण्यात सहकार्य केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात एमकेसीएलचे विविध कोर्सेस

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय व एमकेसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील वाणिज्य व शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध कोर्सेस डिसेंबर महिन्यापासून सुरू केले जाणार आहेत.

रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला एमकेसीएल केंद्राची मान्यता मिळाली असून या केंद्राचे प्रमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड हे असतील. प्रामुख्याने वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स एक्सेल व टॅली प्रो या कोर्से सचा समावेश आहे, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व कॉम्प्युटर सायन्स या विभागातील विद्यार्थ्यांसाठी सायबर सेक्युरिटी, हार्डवेअर सपोर्ट, मोबाईल ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट हे कोर्स घेण्यात येणार आहेत.

अकाउंट व फायनान्स विभागातील विद्यार्थ्यांसाठी डेटा एन्ट्री व डेटा मॅनेजमेंट तसेच शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी डिजिटल फ्री डान्सिंग हा कोर्स घेण्यात येणार आहेत. व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी रिटेल मॅनेजमेंट हा कोर्स घेण्यात येणार आहेत. प्रा. स्नेहा लोखंडे या एमकेसीएल समन्वयक म्हणून प्रा. राहुल कांबळे हे सल्लागार म्हणून तसेच लर्निंग फॅसिलेटेटर म्हणून प्रा. राजश्री म्हात्रे तसेच रिजवाना मोमीन हे सर्वजण कामकाज पाहणार आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे (समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना या सर्व कोर्सेससाठी नोंदणी करून फायदा घेण्याचे आवाहन केले आहे.

# महिलांसाठी एक दिवसीय योगा प्रशिक्षण शिबिर

## भाजपच्या मिनल ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एम आयडीसी परिसरातील कराडे खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील सर्व महिलांना योगा, प्राणायम्, ध्यानधारणा प्रशिक्षण मिळावे यासाठी माजी प्रभारी सरपंच तथा विद्यमान उपसरपंच मिनल धनाजी ठोंबरे यांनी गुरुवारी (दि.२३) त्यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी योगा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन ग्रामपंचायत सभागृहात करण्यात आले होते.

या वेळी सरपंच भारती चितळे व उपसरपंच मिनल ठोंबरे यांच्या हस्ते सावित्रीमाई फुले व राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यानंतर माजी सरपंच किरण माळी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून ग्रामपंचायत कमिटीच्या वतीने उपसरपंच मिनल धनाजी ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून शुभेच्छा दिल्या. या वेळी योगा ट्रेनर ऐश्वर्या समेळ यांनी महिलांना योगा प्रशिक्षणाची माहिती देऊन योगाचे महत्त्व विशद केले. यानंतर प्रशिक्षण शिबिराला सुरुवात करण्यात आली.

या वेळी सरपंच भारती चितळे, माजी सरपंच किरण माळी, माची उपसरपंच रवींद्र चितळे, माजी उपसरपंच भानूदास माळी, पोलीस पाटील सुजाता माळी, माजी उपसरपंच मुकेश पाटील, धनाजी ठोंबरे, राजू चितळे, प्रशांत चितळे, योगेश मुरकुटे आदीसह ग्रामपंचायत आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड व अंडरपास मंजूर

त्यानुसार ४.०१८ किमी लांबीचा सर्व्हिस रोड चेनेज ७५+७६५पासून ७९+७८३ पर्यंत मंजूर केलेला आहे.

यासाठी अंदाजे १०३.२१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या सर्व्हिस रोडमुळे नैना व परिसराच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. त्यामुळे स्थानिक जनतेच्या वतीने आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्र शासन व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना धन्यवाद देत आभार मानले आहेत.

## बा विठ्ठला, राज्यातील जनतेच्या मनोकामना पूर्ण करण्याची ताकद दे

पुरातत्व विभागाला माझे सांगणे आहे की, कोट्यवधी लोकांच्या भावना यासोबत जोडलेल्या आहेत. त्यामुळे हे काम उत्तम आणि लवकरात लवकर झाले पाहिजे. पंढरपूर विकास आराखडा हा सर्वांना सोबत घेऊन करायचा आहे.

महाराष्ट्रातला प्रत्येक व्यक्ती सुखी झाला पाहिजे, हेच विठुरायाकडे मागणे आहे. राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांवर मोठे संकट आहे. शेतकऱ्याला समाधान देण्याची शक्ती विठुरायाने आम्हाला द्यावी. राज्यात आज अनेक समाजाचे प्रश्न आहेत. मराठा समाज, धनगर समाज, ओबीसी, आदिवासी समाजाचे प्रश्न आहेत. ज्या पद्धतीने ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदानामध्ये सर्वांसाठी प्रार्थना मागितली, त्याच पद्धतीने विठुराया चरणी मी मागणे मागतो की, सर्वांच्याच मनोकामना पूर्ण करण्याची ताकद त्याने आम्हाला द्यावी, असे साकडे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी घातले.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघात

**चिमुकलीसह तिघांचा मृत्यू**

**पालघर** : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी (दि. २३) पालघरच्या मेंढवन घाटात कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमधील तिघेही एकाच कुटुंबातील असून यामध्ये एका पाच वर्षीय चिमुकलीचादेखील समावेश आहे, तसेच तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर उपचार सुरू असून एकाची प्रकृती गंभीर आहे.

मुंबईहून गुजरातकडे जाणाऱ्या भरधाव कारवरील ताबा सुटला. त्यामुळे ही कार विरुद्ध दिशेला जाऊन टँकरला धडकली. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा चुराडा झाला. हर्षद गोडबोले (वय ४२), आनंदी गोडबोले (वय पाच) आणि वाहनचालक मिलिंद वैद्य (वय ४३) यांचा मृत्यू झाला तर हर्षदा गोडबोले (वय ३७), अद्वैत गोडबोले (वय १२) गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातानंतर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. त्यानंतर अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासनदेखील तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त कुटुंब हे पुण्याचे होते.

# डोलकाठीच्या तुऱ्यावर गरुडध्वज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

देऊळवाडी किरवली येथील कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी परंपरेनुसार डोलकाठीच्या टोकाला बांधण्यासाठी ढाक डोंगरावरील चढण्या-उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या भैरी मंदिरातून गरुडध्वज आणला. या वेळी ढाक डोंगरावर गेलेल्यांमध्ये युवकांचा सहभाग होता.

सकाळी गरुडध्वजाची पूजा भिवसेन बडेकर यांच्या हस्ते देऊळवाडी येथील मंदिरात करण्यात आली. त्यानंतर श्री ग्रामदेवी बहिरी तळई संस्थान, देऊळवाडी किरवलीचे सचिव दिलीप बडेकर, प्रकाश बडेकर, प्रतिक बडेकर, प्रथमेश गायकर, सोहम आंबले, साहिल बडेकर, अजित जाधव, नयन बडेकर, राजू बडेकर, सुनील अहिर, किशोर बडेकर, रोहिदास पाटील, प्रशांत दिसले, सतीश ठोंबरे, रवींद्र बडेकर, अशोक बडेकर आदी ग्रामस्थ गरुडध्वज आणण्यासाठी ढाक डोंगरावर गेले होते. तो गरुडध्वज ढाक भैरी मंदिरात आणल्यानंतर गरुडध्वजाची पूजा पुरोहित



गजानन उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप बडेकर यांच्या हस्ते करून अभिषेक करण्यात आला. त्यानंतर हे सारे भाविक मार्गस्थ झाले.

हा गरुडध्वज देऊळवाडी येथे आणण्यात आला. हा ध्वज ढोलकाठीच्या तुऱ्यावर बांधण्यात येणार आहे. त्यानंतर रविवारी (दि. २६) ही डोलकाठी मंदिराजवळ उभी करण्यात येणार आहे. २७ नोव्हेंबर रोजी कार्तिक पौर्णिमेला या डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही ३० फूट उंचीची डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेऊन नाचविण्यात येते. हे दृश्य फारच रोमांचकारक असते. यंदा परंपरागत असलेली यात्रा उत्साहात होणार असून हार - फुलांसह प्रसादाची व खेळण्यांची आदी दुकाने असणार आहेत.

# खाडी प्रदुषणामुळे मच्छिमारांची उपासमार

## उरण तालुक्यात पारंपारिक व्यवसाय घटला

**उरण : प्रतिनिधी**

उरण-पनवेलच्या विविध खाड्या, किनारपट्टीवरील जलप्रदूषण वाढले आहे. तर दुसरीकडे मातीचा भराव करून खाडीमुख बुजविण्यात येत आहेत. खाडीतील वाढते जलप्रदूषण आणि भराव यामुळे किनाऱ्याच्या परिसरात आढळणाऱ्या विविध माश्यांच्या काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांना याचा आर्थिक फटका बसला आहे. या मत्स्य दुष्काळाने उपासमारीची वेळ आली आहे.



उरण-पनवेल परिसरातील करंजा, मोरा, हनुमान कोळीवाडा, पाणजे, कुंडेगाव खोपटा, वशेणी, न्हावा, गव्हाण, कोपर, उलवा आदी परिसर पारंपारिक मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. या किनाऱ्यावर कोळी समाजाची मोठी वस्ती आहे. पारंपारिक पद्धतीने सुरु असलेला मासेमारीचा व्यवसायच येथील मच्छीमारांचे रोजी रोटीचे साधन आहे. पारंपारिक पद्धतीमध्ये बदल करून या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून व्यवसायात वाढ केली आहे.

गेल्या काही वर्षात या व्यवसायात अनेक अडचणी उदभवू लागल्या आहेत. वाढत्या जल प्रदूषणामुळे या व्यवसायावर फार मोठे संकट आले आहे. त्यामुळे किनाऱ्यालगत आणि खाडीत मासळीचे प्रमाण घटले आहे. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन या संस्थेने मुंबई परिसरातील व किनारपट्टीच्या परिसरात मत्स्यव्यवसायावर संशोधन केले. या संस्थेच्या अहवालानुसार मुंबई, रायगडच्या सागरी व खाडी परिसरात १२५ माश्यांच्या जाती आढळून येत होत्या. त्यापैकी आता फक्त ७८ जाती शिल्लक आहेत.

खाडी, किनारपट्टीवर मिळणारे बोंबील, ढोमी, मांदेली, घोळ, कलेट, कोलंबी, शिंगाली, चिंबोरी, खुबे, कालवे, निवट्या, कोळीम, बोईट, पाखट, बाकस, हेकरु, तांब, मुशी, रावस, जिताडी, शेवंड, पाला, करपाल, टायनी-कापसी कोळंबी, इत्यादी माश्यांचे प्रकार आढळतात. हेच मासे कोळी बांधवाना दैनंदिन रोजी-रोटी मिळवून देतात.

### ...म्हणून मासळींचे प्रमाण होतेय कमी

प्रक्रिया न करता सोडण्यात येणाऱ्या रासायन मिश्रित दुषित सांडपाण्यामूळे जल प्रदूषण वाढले आहे. वाढत्या प्रदूषणामुळे या क्षेत्रांतील भागातून विविध माश्यांच्या जाती नष्ट होत चालल्या आहेत. यामुळे मासळींचे प्रमाण कमी झाले आहे.

वाढत्या जलप्रदूषणामुळे मासेमारी क्षेत्र तसेच मासळीच्या प्रजननाची ठिकाणे नष्ट झाले आहेत तसेच चिखलाचे थर वाढले आहेत. जलप्रदूषणामुळे पारंपारिक मासेमारी धोक्यात आली असल्याची माहिती मच्छिमारांनी दिली आहे.

# सिडको महामंडळातर्फे अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या जमिनीवर तसेच संपादित करण्यात येत असलेल्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्याविरुध्द सिडको महामंडळाने कारवाई केली आहे.

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या जमिनीवर व संपादित करण्यात येत असलेल्या भूखंडावर तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रकल्पासाठी संपादित केलेल्या भुखंडावर अनधिकृतपणे डेब्रीज टाकण्यात येत होते. या प्रकारास आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली सिडको महामंडळातील अभियांत्रिकी विभागाचे अभियंते, मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागाचे अधिकारी व अभियंते तसेच सुरक्षा विभागाचे सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक व दक्षता विभागाचे मार्फतीने धडक मोहिम राबवून अनधिकृतपणे डेब्रीज टाकणारे डंपर चालकांविरुध्द गुरुवारी (दि. २३) मध्यरात्रीच्या दरम्यान कारवाई करण्यात आली.

यामध्ये गव्हाणपाडा येथे २ डंपर व २ डंपर चालक तसेच खारघर सेक्टर १२ येथे १ डंपर व दोन व्यक्तींना ताब्यात घेऊन त्यांचे विरुध्द अनुक्रमे न्हावाशेवा व खारघर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रीज टाकत असताना कोणी आढळल्यास सिडकोच्या www.cidco.maharashrta.gov.in या वेब साईट वर तसेच संबंधीत पोलीस ठाण्यात कळविण्यात यावे, असे याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

# तीन बांगलादेशीय पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल बस आगाराच्या परिसरात तीन बांगलादेशी नागरिकांना पनवेल शहर पोलिसांनी चार दिवसांपूर्वी ताब्यात घेतले आहे. या तिघांची नावे अली हाफीज शेख, रबीवुल मनन शेख, मेसन किसलू मुल्ला अशी आहेत. हे तिघेही काही महिन्यांपासून नवी मुंबईतील दारावे गावात राहत होते.

या तिघांनीही बांगलादेश आणि भारत सीमेवरून घुसखोरी केली आहे. तसेच ते विनापारपत्र नवी मुंबईत राहत होते. बांगलादेशातील नोडाईल जिल्ह्यातील जामवीर पडोली या गावातील हे तिघेही मूळ रहिवासी आहेत.

तिघे पनवेल एसटी स्टॅन्ड परिसरात वावरत असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना पोलिसांनी त्यांना गुप्तबातमीद्वारा मिळली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहाय्यक निरीक्षक पवार, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार वाघमारे, परेश म्हात्रे, गंथडे, नाईक पारधी, राठोड, शिपाई दाहीजे, कांबळे, मोकल आदींच्या पथकाने सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. त्यांना लवकरच कायदेशीर कार्यवाहीनंतर त्यांच्या मूळगावी पाठविणार आहेत.

# एमजेपीच्या पाणी शुद्धीकरण केंद्रातील पंपाची दुरुस्ती

## पनवेलमध्ये पुढील ८ ते १० दिवस पाणी कपात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह सिडको वसाहतींना पाणीपुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (एमजेपी) वायाळ येथील पाणी शुद्धीकरण केंद्रातील मोटार पंप नादुरुस्त झाल्याने पुढील ८ ते १० दिवस दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेतले आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्थेतून पाणीपुरवठा केला जाणार आहे.

पुढील काही दिवस पनवेलकरांना ३० ते ४० टक्के पाणी कपातीचा सामना करावा लागणार आहे. एमजेपी पनवेल महापालिकेला आणि सिडको वसाहतींना न्हावाशेवा उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील टप्पा-१ यामधून पाणी पुरवठा करते. मंगळवारी मध्यरात्रीपासून वायाळ येथील केंद्रातील पाण्याचा पंप नादुरुस्त झाल्याने काम हाती घेतल्याची माहिती एमजेपीचे उप विभागीय अभियंता के. बी. पाटील यांनी सांगितले.

एमजेपीने याबाबत करंजाडे, डेरीवली, वडघर, विचुंबे, उसर्ली, बेलवली-वारदोली, नांदगाव, कुडावे या गावांसह, सिडको महामंडळ, पनवेल महापालिका, बेलापूर रेल्वे प्रशासन, वीज महावितरण कंपनी यांनाही नोटीसीद्वारे कळविले आहे. या अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे पनवेल महापालिका आणि सिडको मंडळाच्या व्यवस्थापनाने पाणी कपातीदरम्यान पर्यायी पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्याचे पत्रकात सूचविले आहे.



**पनवेल :** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसानिमित्त पनवेल महापालिका क्षेत्रात २०२३ मध्ये जन्मलेल्या मुलींना सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ देण्याचा संकल्प करून स्वखर्चाने प्रत्येक बालिकेचे एक हजार रुपये भरून आमदार प्रशांत ठाकूर यांनी बालिकांचे नवीन खाते उघडले. त्या अनुषंगाने भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, भूपेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर यांनी बालिकांच्या पालकांकडे खाता पासबुक आणि खेळणी प्रदान केली.



**पनवेल :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस बुधवारी विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून शेलघर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत मंदार भगत यांच्या वतीने वह्या आणि पेन वाटप करण्यात आले. या वेळी अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सी. एल. ठाकूर, संतोष पाटील, सुदर्शन भगत, आदर्श पाटील, संतोष भगत, शुभ पाटील, मंदार भगत, प्रल्हाद भगत, रतन भगत, रमेश घरत, गुलाब घरत, बाळकृष्ण भगत, जगजीवन भगत, राजू भगत, निलेश भगत, प्रितम भगत, आषुय मढवी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त शेलघर येथे त्यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, भाजप नेते दशरथ म्हात्रे, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, भाजप युवा मोर्चाचे दिनेश खानावकर, मोतीलाल कोळी, रतनशेठ भगत, संतोष भगत आणि परिवार, सचिन भगत आणि परिवार, सुधीर भगत आणि परिवार, रमेश घरत, गुलाबशेठ, निलेश भगत, उद्योगपती महालेसाहेब, धीरज ओवळेकर, निलेश खारकर, शैलेश भगत, नितेश म्हात्रे, प्रवीण ठाकूर, दीपक गोंधळी, महेश पाटील, भूषण गायकवाड, शुभम पाटील, जावई हरेश्वर पाटील आणि परिवार, जावई शिवकुमार मढवी आणि परिवार, भूषण भगत, मयुर भगत, सुरज भगत, प्रमोद भगत, रमेश घरत आणि परिवार, वितेश म्हात्रे, शैलेश भगत, रहिम लदाप, प्रतिक, निखील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, अरुणशेठ भगत यांचे नातेवाईक उपस्थित होते. सर्वांनी अरुणशेठ भगत यांचे वाढदिवस अभीष्टचिंतन केले. दरम्यान, भाजप कार्यालयातही अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अरुणशेठ भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# पायावर धोंडा

राहुल गांधी यांचे 'पनौती'विषयीचे वक्तव्य धिक्कारार्हच आहे आणि यासाठी त्यांनी माफी मागितलीच पाहिजे. निवडणुकीतील टीकेचे बाण सगळ्यांच्याच सवयीचे असतात. शेरेबाजी, उखाळ्यापाखाळ्या, आरोपप्रत्यारोप हे सारे प्रचाराच्या रणधुमाळीत चालूच असते, परंतु असले अश्लाघ्य उद्गार काढून राहुल गांधी यांनी स्वत:च्याच पायावर धोंडा मारून घेतला आहे.

**स्वत:च्याच वाणीदोषामुळे अवसानघात करून घेण्याची काही जणांना खोडच असते. आपल्या बेताल आणि बेलगाम बडबडीमुळेच आपली अवस्था दारूण झाली आहे याचे भान त्यांना नसते. अर्थात सार्वजनिक जीवनात अशा प्रकारचे भान असणाऱ्याला प्रगल्भ म्हटले जाते. ती परिपक्वता काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यामध्ये मुदलातच नाही याचे प्रत्यंतर पुन्हा एकदा नुकतेच आले. गेल्या रविवारी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम लढतीत भारतीय संघाला पराभव पत्कारावा लागला. पुन्हा एकवार विश्वचषक जिंकण्याचे क्रिकेट चाहत्यांचे स्वप्न चक्काचूर झाले. खुद्द भारतीय संघातील क्रिकेटपटू डोळ्यांतील अश्रू लपवत ड्रेसिंग रूमकडे परतताना लाखो प्रेक्षकांनी पाहिले. ड्रेसिंग रूममध्ये जाऊन त्यांची पाठ थोपटून धीर देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिले होते. ''तुम्ही खूप छान खेळलात, पण खेळात असे व्हायचेच'' अशा शब्दांत भारतीय संघाचे सांत्वन करून त्यांनी मने जिंकली. त्याआधी अंतिम लढतीची शेवटची काही षटके ते स्टेडिअममध्ये उपस्थित होते. पंतप्रधान मोदींची तेथील उपस्थिती काही जगावेगळी नव्हती. यापूर्वी पंतप्रधान मनमोहन सिंग हेदेखील अशा महत्त्वाच्या सामन्यांना आवर्जून हजेरी लावत असत, परंतु पंतप्रधान मोदी यांचे तेथे उपस्थित असणे काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना मात्र खटकले. राजस्थानमध्ये सध्या निवडणुकांचे वातावरण आहे. तेथील प्रचाराची रणधुमाळी गुरूवारी संपुष्टात आली. मंगळवारी तेथील एका गावात प्रचार सभेत बोलताना राहुल गांधी यांनी पंतप्रधानांच्या स्टेडिअममधील उपस्थितीकडे निर्देश करीत 'पनौती' या शब्दावर कोटी करण्याचा प्रयत्न केला. 'आपले बच्चे विश्वचषक जिंकणारच होते, पण पनौतीमुळे हरले' असे अत्यंत तुच्छतेने भरलेले अपमानजनक उद्गार त्यांनी काढले. त्यामुळे देशभर संतापाची लाट उसळली आहे. खरे तर, काँग्रेसी नेत्यांनी ज्या-ज्या वेळी मोदी यांना अपमानजनक दूषणे दिली. तेव्हा-तेव्हा त्याची जबर किंमत काँग्रेस पक्षाला मोजावी लागली आहे. २००७ साली गुजरातमधील निवडणुकीच्या वेळी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना 'मौत का सौदागर' असे विशेषण बहाल केले होते. त्यामुळे गुजरातमधील जनता खवळून उठली होती. त्याचे प्रतिबिंब निवडणुकीच्या निकालात पडलेले दिसले आणि तिथून पुढे काँग्रेसच्या वाताहतीचा कालखंड सुरू झाला असे मानले जाते. २०१४च्या सार्वत्रिक निवडणुकीत काही काँग्रेस नेत्यांनी मोदी यांना चहावाला, असे हिणवले होते. मणिशंकर अय्यर यांनी तर मोदी यांना नीच जातीचा असे म्हणून अपमान केला होता. या साऱ्या शिव्याशापांच्या भडिमारातून तावूनसुलाखून निघालेले पंतप्रधान मोदी यांचे व्यक्तिमत्त्व आज भारतीय जनतेच्या गळ्यातील ताईत बनले आहे. 'तुम्ही जितक्या दगडविटा फेकाल, त्या दगडविटांनिशी मी यशाची बुलंद इमारत उभी करीन', असे सडेतोड उत्तर मोदी यांनी अवहेलना करणाऱ्या विरोधकांना केव्हाच दिले आहे. राहुल गांधी यांच्या वक्तव्यामुळे राजस्थानातील निवडणुकीचा निकाल कसा लागणार आहे हे स्पष्टच झाले. अर्थात यातून शहाणपण शिकण्याची अपेक्षा काँग्रेसनेत्यांकडून कदापिही करता येणार नाही.**

# रायगडात शिक्षण विभागाचा कारभार मंदावला

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात शिक्षण विभागाचा पुरता बोजवारा उडाला आहे. जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील योजनांची व नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक अधिकाऱ्यांची कमतरता शिक्षण विभागाला भेडसावत आहे. जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी १३ तालुक्यांमधील गटशिक्षण अधिकारी हे पद रिक्त असून, त्यांचा कारभार शिक्षण विस्तार अधिकारी किंवा इतर क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या खांद्यावर सोपवून, शिक्षण विभागाचा गाडा हाकला जात आहे. अधिकाऱ्यांची पद रिक्त असल्यामुळे शिक्षण विभागाचा कारभार मंदावला आहे.

मागील काही वर्षांपासून जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता ढासळल्याची बोंब सुरू असून, पटसंख्याही घटत आहे. त्यामुळे शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. आता तर सर्व शिक्षा अभियान तसेच इतर योजनांच्या माध्यमातून शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांबरोबरच खासगी शाळांवरही शिक्षण विभागामार्फत देखरेख ठेवली जाते, मात्र त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची गरज असते. जिल्हास्तरावर शिक्षण विभागात शिक्षण अधिकाऱ्यांनंतर उपशिक्षण अधिकारी हे पद आहे. त्यानंतर तालुकास्तरावर गटशिक्षण अधिकारी गट शिक्षणाधिकारी हा जबाबदार अधिकारी असतो, मात्र जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी केवळ खालापूर, माणगाव या दोन तालुक्यात गटशिक्षण अधिकारी पद भरले गेले आहे. उर्वरित १३ तालुक्यांमधील गटशिक्षण अधिकारी पद रिक्त आहे. सर्व रिक्त पदांचा कार्यभार इतर अधिकार्यांकडे प्रभारी देऊन कामकाज केले जात आहे.

गटशिक्षण अधिकाऱ्यांनंतर तालुक्यात केंद्र प्रमुख हे पद महत्त्वपूर्ण आहे. शाळांनी भेटी देणे, शाळांमध्ये राबविण्यात येणार्या सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे यासह इतर महत्त्वपूर्ण कामे केंद्रप्रमुख करतात. जिल्ह्यात केंद्रप्रमुखांची २२८ पदे मंजूर असून, यामधील १३७ पदे भरली आहेत तर ९१ पदे रिक्त आहेत. अधिकाऱ्यांची पद रिक्त असल्यामुळे शिक्षण विभागाचा कारभार मंदावला आहे. क्षेत्रीय पर्यवेक्षक नाहित त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत आहे.

प्रथमिक विभागत १५ तालुक्यांसाठी प्रत्येकी एक गटशिक्षण अधिकारी पाहिजे, परंतु केवळ दोन तालुक्यांना गटशिक्षण आधिकरा आहेत. इतर ठिकाणी प्रभारी गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे या पदांचा अतिरिक्त पदभार आहे. याचा विपरित परिणाम शिक्षण विभगाच्या दैनंदिन कामकाजवार होत आहे. एक व्यक्तीकडे दोन किंवा तीन पदांचा पदभार आसेल तर ती व्यक्ती पदाला कसा न्यायदेणार. तसेच ज्यांच्याकडे पदभार आहे ते आधिकरी काही निर्णय घेऊ शकत नाहीत. सक्षम अधिकारी नसल्यामुळे कामवार परिणाम होतो. क्षेत्रीय पर्यवेक्षक नसल्यामुळे शिक्षाणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. प्रथमिक शिक्षण विभागासाठी शिक्षणाधिकारीच नाही. त्यामुळे काही महत्त्वाचे निर्णय घेताना अडचणी निर्माण होत आहेत. कोणत्याही योजना राबवण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

शिक्षण विभागातील रिक्त पदांबाबत जिल्हा परिषाद प्रशासन काहीच करू शकत नही. करण ही सर्व पदे राज्य शासनाची आहेत. राज्य शासनाने पद भरती केलेली नाही. पद भरण्यात यावीत यासाठी राजयगड जिल्हा परिषद प्रशासन पाठपूरावा करत आहे. अनेक पत्र शिक्षण संचालकांना पाठविण्यात आली आहेत, परंतु राज्य शासन हा विषय गांभिर्याने घेत नाही. शिक्षकांच्या बदल्यांमध्ये जेवढ लक्ष घतल जात त्या तुलनेत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पद भारावीत यासाठी कुणी प्रयत्न करता नाही. अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत कुणी आवाज उठवत नाहित.

रायगड जिल्हा मुंबईच्या जवळ आहे असे असतानादेखील रायगड जिल्ह्यात शिक्षण विभगातील पद मोठ्या प्रमाणावर रिक्त राहतात हे या जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाचे आपयश आहे. राज्य शासनाचे अधिकारी पद भरतीबाबत काही नियम आहेत. यासाठी रोटेशन पध्द वापरली जाते. त्याठी प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे. अधिकारी भरतीसाठी विदर्भ, मराठवाडा, उत्तरमहाराष्ट्र, पश्चिरम महाराष्ट्र , कोकण असे प्राधान्यक्रम देण्यात आले आहे. त्यामुळे कोकणात अधिकाऱ्यांची पदं शेवटी भरली जातात.

अधिकाऱ्यांची पद रिक्त असल्यामुळे शिक्षण विभागाचा कारभार मंदावला आहे. शिक्षण विभागाचा पुरता बोजवारा उडाला आहे, परंतु याकडे कुणी गांभिर्यांने पहात नाही. रायगड जिल्ह्यात अधिकारी कमी असण्याचे एक महत्वाचे कारण आहे येथील राजकीय परिस्थिती. जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीची माहिती संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. त्यामुळे अधिकारी वर्ग रायगडात येणास तयार होत नाही. अधिकाऱ्यांवर हात उचलण्यापर्यंत मजल जाते, अशा परिस्थतीत अधाकरी वर्ग रायगडात येण्यास तयार होत नाही. ही परिस्थिती ही परिस्थती बदलण्याची जबाबदारी येथील राजकीय नेत्वृत्वार आहे. ज्याप्रमाण आपल्या मर्जीतील शिक्षकांची बदली करण्यासाठी प्रयत्न कले जातात तसेच अधिकाऱ्यांची पदं भरण्याचा प्राधान्यक्रम बदलण्यासाठी येथील लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले पाहिजेत.

# आज तुळशी विवाह, जाणून घेऊया प्रथा-परंपरा




आजपासून तुळशी विवाहाला सुरूवात होते आहे, तसेच आज चातुर्मासाची समाप्तीही आहे. भारतीय संस्कृतीत चातुर्मासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या चातुर्मासाच्या कालावधीत आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन व कार्तिक या महिन्यांचा समावेश होतो. धार्मिक संकल्पनेनुसार या काळात देव झोपी गेल्याने कार्यरत नसतात, म्हणूनच व्रतवैकल्याद्वारे साधना करावी असे सुचविले जाते. त्या अनुषंगाने या काळातील व्रतवैकल्यांच्या नियमांचे प्रयोजन केलेले दिसते. या आध्यात्मिक व धार्मिक कारणांव्यतिरिक्त चातुर्मासाच्या प्रयोजनामागील नैसर्गिक, भौगोलिक तसेच आयुर्वेदीय कारणमीमांसाही विशेष उल्लेखनीय आहे.

कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायन सुरू होते. पौराणिक कथांनुसार दक्षिणायन ही देवांची रात्र मानली जाते, तर उत्तरायण हा देवांचा दिवस असतो. म्हणजेच देवांची रात्र कर्क संक्रांतीला म्हणजेच आषाढ महिन्यात सुरु होते. व येथूनच सुरुवात होते ती चातुर्मासाला. आषाढ शुद्ध एकादशीपासून कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत अथवा आषाढ पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंतच्या चार महिन्यांच्या काळास 'चातुर्मास' असे म्हणतात. चातुर्मासाची सुरुवात होते ती आषाढ शुद्ध एकादशीपासून, ही एकादशी देवशयनी एकादशी म्हणूनही प्रसिद्ध आहे. परंपरागत चालत आलेल्या कथांनुसार या दिवसापासून पुढील चार महिन्यांच्या काळात देव झोपी जातात. म्हणूनच या एकादशीस देवशयनी एकादशी असेही म्हटले जाते. या काळात श्रीविष्णू क्षीरसागरात चिरनिद्रा घेतात म्हणूनच ही एकादशी विष्णुशयनी अथवा हरिशयनी एकादशी म्हणूनही ओळखली जाते.

पुराणांमध्ये हरी हा शब्द सूर्य, चंद्र, वायू, विष्णू अशा अनेक अर्थांनी वापरला जातो. पावसाळ्यात ढगाळ वातावरणामुळे सूर्य-चंद्र दिसेनासे होतात म्हणूनच या काळासाठी केलेला हरिशयन असा उल्लेख योग्यच वाटतो. या काळात विष्णू व इतर देव कार्यरत नसले तरी सृष्टी निर्माणकर्ता ब्रह्मदेव मात्र या कालावधीत आपले नवनिर्मितीचे कार्य करत असतो असे मानले जाते. तसेच कार्तिक महिन्यात येणाऱ्या शुक्ल पक्षातील एकादशीला देवोत्थान, देवउठनी किंवा प्रबोधिनी एकादशी म्हणतात. हा दिवस देवतांच्या उठण्याचा म्हणजे कार्य सुरु करण्याचा दिवस मानला जातो. कार्तिक एकादशी पासून ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत हे पर्व तुलसी विवाह म्हणून साजरे केले जाते. एकूणच या विवाहाच्या निमित्ताने गेल्या चार महिन्यात व्रत वैकल्याच्या माध्यमातून निसर्गाच्या सर्जनतेसाठी आपली जी विहित कार्य काही काळ थांबलेली असतात, त्यांना परत सुरु केले जाते. यावर्षी प्रबोधिनी एकादशी म्हणजेच तुलसी विवाहास प्रारंभ २३ नोव्हेंबर २०२३ रोजी म्हणजे आज होत आहे. या दिवशी शाळीग्राम रुपी विष्णूचा तुळशीसोबत विवाह लावण्यात येतो.

## बदलते तंत्रज्ञान

# रिलायन्स कंपनी लवकरच करणार स्वस्त लॅपटॉप लाँच



नोकरी, कॉलेज, शाळा आदी ठिकाणांच्या काही महत्त्वाच्या कामांसाठी घरी लॅपटॉप किंवा संगणक असणे महत्त्वाचे असते, पण विविध कंपन्यांचे अनेक लॅपटॉप खूप जास्त महाग असतात. त्यामुळे हे लॅपटॉप, संगणक खरेदी करायचे की नाही, असा प्रश्न ग्राहकांना पडतो. जर तुम्ही कमी पैशात लॅपटॉप खरेदी करण्याचा विचार करीत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी खास ठरेल. भारतात टेलिकॉम क्षेत्रात अग्रगण्य कंपन्यांपैकी एक असलेली रिलायन्स जिओ एक लॅपटॉप घेऊन येत आहे.

जिओ बुक लॅपटॉप लाँच केल्यानंतर आता आता कंपनी 'क्लाउड लॅपटॉप' लाँच करण्याच्या तयारीत आहे. या लॅपटॉपची किंमत १५ हजार रुपयांपर्यंत असू शकते, असे सांगण्यात येत आहे. रिलायन्स जिओ कंपनी एचपी, लिनोवो, एसर व इतर संगणक बनवणाऱ्या कंपन्यांसोबत मिळून जिओ या लॅपटॉपच्या निर्मितीवर काम करीत आहे.

क्लाउड हा शब्द तुम्ही अनेकदा ऐकला असेल. तुमच्या मोबाईलमध्येही हे अॅप उपलब्ध आहे. क्लाउड स्टोरेज म्हणजे तुमची एखादी महत्त्वाची गोष्ट स्टोअर करून ठेवणे. त्यामुळे युजरच्या फोनमध्ये काही जागा शिल्लक राहते. कंपनी आपल्या सर्व्हरवर डेटा सेव्ह करून ठेवते. गुगल फोटो आणि गूगल ड्राइव्हसुद्धा याप्रमाणे काम करते.

क्लाउड संगणक आणि लॅपटॉपदेखील या अॅपसारखेच काम करते. युजर्सना एखादा साधा लॅपटॉप किंवा संगणक खरेदी करावा लागतो, मात्र इतर लॅपटॉपप्रमाणे त्यात कोणतेही सॉफ्टवेअर डाउनलोड करण्याची गरज नसते. त्यामुळे क्लाउडवर सेव्ह असणारे सॉफ्टवेअर या लॅपटॉपमध्ये थेट वापरता येते. त्यामुळे स्वस्तात मस्त लॅपटॉपमध्येही ग्राहकांना उच्च दर्जाचे काम करता येणार आहे.

साधारणपणे एखाद्या लॅपटॉपची किंमत ही त्यातील ग्राफिक्स कार्ड, मेमरी व रॅम अशा गोष्टींमुळे वाढते, मात्र क्लाउड लॅपटॉपमध्ये या गोष्टींची गरज भासणार नाही. लॅपटॉपची संपूर्ण प्रक्रिया जिओ क्लाउडच्या बॅक एण्डला केली जाईल. ग्राहकांना स्वस्त लॅपटॉप घेऊनही उत्तम दर्जाचे काम करता येणार आहे, मात्र अद्याप कंपनीने याबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही, पण IndianTechGuide यांच्या अधिकृत एक्स (ट्विटर) अकाउंटवरून ही माहिती देण्यात आली आहे.

# लेखक, कवी, नाटककार, समीक्षक केशव मेश्राम



**निमित्त**

केशव तानाजी मेश्राम हे मराठी भाषेतील लेखक, कवी, नाटककार व समीक्षक होते. त्यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९३७ रोजी झाला. ते सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई येथून एमए (मराठी) झाले. त्यांना प्रारंभी मोलमजुरीची कामे करावी लागली.

नंतर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मेश्राम यांनी रेल्वे खात्यात नोकरी केली. त्याच काळात 'रूपगंधा' नियतकालिकात काम केले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होताच रेल्वे खात्यातील नोकरीचा राजीनामा देऊन ते महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून रूजू झाले. तेथील एक वर्षाच्या नोकरीनंतर त्यांनी मुंबई येथे महर्षी दयानंद सरस्वती महाविद्यालयात अध्यापनकार्य केले. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातही प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून सेवा केल्यानंतर नोव्हेंबर १९९७मध्ये ते सेवेतून निवृत्त झाले.

वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून लेखन करणाऱ्या मेश्रामांचा मूळ पिंड कवीचा होता. 'कविता' हा त्यांचा विशेष आवडीचा साहित्यप्रकार. 'रहस्यरंजन' विशेषांकात त्यांची 'मेळा' ही पहिली कविता प्रसिद्ध झाली (१९५८). त्यानंतर त्यांनी सातत्याने काव्यलेखन केले. 'उत्खनन' (१९७७), 'जुगलबंदी' (१९८२), 'अकस्मात' (१९८४), 'चरित' (१९८९), 'कृतकपुत्र' (२००१), 'अनिवास' (२००५) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. डॉ. सुमतेन्द्र नाडिग यांच्या मूळ कन्नड भाषेतील चिंतनकाव्याचा त्यांनी 'दाम्पत्यगीता' हा मराठी भावानुवाद केला.

दलित कवितेच्या प्रारंभ काळातील एक प्रमुख कवी म्हणून त्यांचा उल्लेख होतो. सर्व प्रकारच्या अनुभवांना मोकळेपणाने सामोरी जाणारी त्यांची कविता असून पारंपरिक लयीतील तसेच मुक्तछंदात्मक लयीतील काव्यलेखनातून त्यांचे काव्यमूल्य सिद्ध होते. समाजातील दैन्य, दारिद्र्य, विषमता व जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतील अनास्था भाव हे त्यांच्या काव्यलेखनाचे विषय होते. नव्या पिढीच्या ध्येयशून्य तडजोडीची वेदनाही त्यांच्या काव्यात उमटलेली दिसते. जीवनातील रूक्ष, कडवट अनुभव काव्यात मांडताना त्यांच्या शब्दांना तीक्ष्ण शस्त्राची धार येते. ते वृत्तीने आत्मरत असले तरीही त्यांची सामाजिक बांधीलकीशी निष्ठा होती. 'उत्खनन', 'जुगलबंदी' या काव्यसंग्रहांमध्ये धर्मव्यवस्थेने लादलेल्या मानहानीच्या जीवनाविरुद्ध विद्रोहाचे भावप्रकटन आले आहे. 'चरित', 'कृतकपुत्र', 'अनिवास'मध्ये त्यांची प्रखर आंबेडकरवादी जाणीव व्यक्त होते.

गतकाळाचे वास्तव नजरेसमोर ठेवून वर्तमानाला सामोरी जाणारी त्यांची कविता असून 'आत्मपीडेकडून आत्मशोधाचा प्रत्यय' हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. 'हकिकत' आणि 'जटायू' (१९७२) व 'पोखरण' (१९७९) ह्या प्रसिद्ध कादंबर्या आहेत. त्यांचे 'खरवड', 'पत्रावळ', 'धगाडा', 'मरणमाळा', आदी नऊ कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या कथालेखनात सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अन्याय-अत्याचार, अपमान, विटंबना, अवहेलना, गुन्हेगारी अशा वास्तवाचे चित्रण आहे.

मेश्राम यांना म. सा. परिषदेचा डॉ.भालचंद्र फडके पुरस्कार (२०००), दलित समीक्षा पुरस्कार (२०००), महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार (२००३), शाहू-फुले परिवर्तन अकादमीचा लेखक सन्मान पुरस्कार (२००३), जीवन गौरव पुरस्कार (२००५) हे पुरस्कार मिळाले. अशा या प्रतिभावान कवीचे २९ नोव्हेंबर २००७ रोजी निधन झाले.


## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : शेतीमध्ये आधुनिक पद्धतीने सर्व कामे होत असली तरी अद्यापही काही ग्रामीण भागात बैलांचा वापर होतो. धान्याची ने-आण बैलगाडीतून होत असते.**

## आरोग्य प्रहर

# पित्ताशयातील खड्यांमुळे शरीराला होणारे त्रास



भारतातील विविध प्रदेशात खाण्याच्या पद्धती, राहणीमान व हवामान वेगळे असल्याने होणारे आजारही वेगळे असतात. याचेच उदाहरण म्हणजे पित्ताशयातील खडे. हल्ली बऱ्याचदा असे रुग्ण येतात की त्यांनी इतर कारणासाठी पोटाची सोनोग्राफी केली असते व त्यांच्या पित्ताशयामध्ये खडे आहेत असे आढळून येते. आपल्या देशातील १३२ कोटी लोकसंख्येच्या १५% व्यक्तींना त्यांच्या आयुष्यात पित्ताशयामध्ये खडे होतात. चांगली गोष्ट म्हणजे त्यातील फक्त दोन-तीन टक्केच व्यक्तींना त्याचा जास्त त्रास होतो.

आहारात स्निग्ध पदार्थांचे प्रमाण जास्त झाले किंवा तंतूमय पदार्थांचं प्रमाण कमी झाले तर पित्तरसाची घनता वाढते व पित्ताशयात छोटे छोटे खडे तयार होतात. हे खडे तीन प्रकारचे असतात कोलेस्ट्रॉल, पिगमेंट, (बिलीरुबीनचे घटक), मिश्र. ७०- ८० टक्के रुग्णामध्ये ते मिश्र प्रकारचे असतात. अगदी लहान खडे पित्तनलिकेवाटे पित्तरसाबरोबर लहान आतड्यात निघून जातात, पण जर त्यांचा आकार मोठा असेल तर ते पित्ताशयाच्या व पित्तनलिकेच्या अरुंद ठिकाणी अडकून राहतात व पित्ताशयाला सूज येऊन जंतूचा प्रादूर्भाव होतो.

सुरुवातीची लक्षणे असिडीटीच्या त्रासासारखीच असतात. सुरुवातीला पोटाच्या वरच्या भागात थोडेसे उजवीकडे दुखायला लागते. गॅसेस होतात. मळमळ सुटते, जळजळ होऊ लागते, त्याबरोबरच एखादा खडा पित्तनलिकेत अडकून राहिला तर पित्तरस आतड्यात नेणारा मार्ग अरुंद होतो व पित्तरस यकृतात (लिव्हर) मध्ये साचू लागतो त्यातील बिलीरुबीन हे रंगद्रव्य रक्तात मिसळतात व काविळीची लक्षण दिसू लागतात. याला अवरोधक काविळ असे म्हणतात. पित्तखड्यांमुळे होणाऱ्या काविळीबरोबर अंगाला खाज सुटते. पित्ताशयातील खड्यांमुळे स्वादुपिंडदाहही होऊ शकतो.

पित्ताशयातील खडे असणाऱ्या ७०-८० टक्के रुग्णांना त्याचा काही त्रास होत नाही. त्यातले काही सोनोग्राफीमध्ये दिसतात. सोनोग्राफीच्या रिपोर्टने घाबरून न जाता जर खड्यामुळे त्रास होत असेल तर शस्त्रक्रियेची गरज असते.

# कर्जतमध्ये कुणबी नोंदी शोधण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या महसूल विभागातील रेकॉर्ड रूममध्ये कुणबी नोंदी यांचा शोध घ्यावा, अशी मागणी कर्जत तालुका सकल मराठा समाजाचे वतीने करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यातील १९४५ पासूनचे रेकॉर्ड शोधण्यात येत असून आतापर्यंत एकही नोंद आढळून आलेली नाही. त्यामुळे सकल मराठा समाजाने पत्र देऊन मागणी केली आहे. कर्जत तालुक्यातील विविध जिल्हा परिषद शाळांमध्ये ४९ कुणबी नोंदी आढळल्या असून त्या नोंदीवरून काढण्यात आलेले जातीचे दाखले पुढे जात पडताळणीमध्ये टिकून राहत नसल्याने तहसील कार्यालयाने पुन्हा नोंदी तपासाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. कर्जत सकल मराठा समाजाने कर्जत तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांची भेट घेतली. सकल मराठा समाजाचे वतीने कर्जत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी सकल मराठा समाजाचे समन्वयक शंकर थोरवे, राजेश लाड, अनिल भोसले, रत्नाकर बेडकर, शिवाजी भासे, कैलास म्हामले, दीपक लाड, नारायण भोईर, प्रमोद खडे, सुरेश बोराडे, अरुण देशमुख, जगदीश ठाकरे, अंकुश दाभणे, चंद्रकांत ढाकवळ, नवीन देशमुख, भारती ढाकवळ, ज्योत्स्ना जाधव, स्वाती नकाते आदी उपस्थित होते.

# खोपोलीत भातकापणी, झोडणीच्या कामांना वेग

**खोपोली : प्रतिनिधी**

पाऊसाची पूर्ण उसंत व कडक ऊन पडण्यास सुरुवात झाली असल्याने दिवाळीनंतर भातकापणी व झोडणीच्या कामाला वेग आला आहे. खालापूर-खोपोली परिसरात सर्वत्र भातकापणीची कामे जोरदार सुरू आहेत.

यावर्षी भातपीक चांगले होते, मात्र परतीच्या पावसामुळे भातपिकाचे काही प्रमाणावर नुकसान झाले आहे. तरीही आहे ते पीक कापणीसाठी व झोडणी करून पिवळे सोने घरात आणण्यासाठी शेतकरी वर्ग रममाण झाला आहे. कापणी व जोडणी या दोन्ही कामांसाठी स्थानिक आदिवासी मजूर उपयोगी पडत असून तालुक्यातील गावागावात सकाळपासून धावपळ सुरू असल्याचे चित्र आहे.





# रायगड जिल्ह्यात विठूरायाचा गजर

**अलिबाग : प्रतिनिधी**

गोरगरीबांचा, शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून श्रध्दास्थान असलेल्या पांडुरंगाच्या कार्तिकी एकादशीचा सोहळा आज सर्वत्र मोठ्या भक्तीभावाने साजरा झाला. रायगडातही विठ्ठल नामाचा गजर दुमदुमला. रायगडात खोपोली येथील साजगावच्या बोंबल्या विठोबाचा पंधरा दिवसाचा जत्रौत्सव आजपासून सुरू झाला.

कार्तिकी एकादशीलादेखील दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने पांडुरंगाच्या दर्शनाला पंढरपूरात जातात. त्यात रायगडातील भाविकांचा सहभाग असतो.

दरम्यान, एकादशीच्या निमित्ताने जिल्ह्यात ठिकठिकाणी विठ्ठल मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. अलिबाग नजिक वरसोली येथे आंग्रेकालीन विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. अलिबाग शहरातील जोगळेकर नाका येथे विठ्ठल मंदिरातदेखील भाविकांनी विठूरायाचे दर्शन घेतले. विठ्ठल रखुमाई मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. संजीव मधूकर मांडे व सौ. रेखा अमित दिघे यांनी मौजे- मालढुंगे ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे - मालढुंगे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| मालढुंगे | संजय बापूसाहेब बांगर | २६ | ३/ब | ७-५२-८०<br>०-८७-२० | ३०.९२ |

**सरद जमिन मिळकती मधील संजय बापूसाहेब बांगर यांच्या अविभाज्य हिश्यातील ५.४५.२० पो.ख ०.५७.२० आकार १०.९२ पैकी ०-१७-०० गुठे जमिन मिळकत**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

**ठिकाण- पनवेल**
**दिनांक : २३/११/२०२३**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता. पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

## ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
**कार्यालय : मु.वाशिवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

जा. क्र ३०९/२०२३ — दिनांक २१/११/२०२३

### ई - निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरिता १० टक्के महिला व बालकल्याण निधीतून ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्यांना भांडी पुरवठा करणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २०/११/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

**सही/-**
**श्रीम. रक्ष्मी रविंद्र शिंदे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

**सही/-**
**सौ. गौरी महादेव गडगे**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

## ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
**कार्यालय : मु.वाशिवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

जा. क्र ३०५/२०२३ — दिनांक २१/११/२०२३

### ई - निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरिता १५ टक्के मागासवर्गीय निधीतून ग्रामपंचायत हद्दीतील मागासवर्गीय भजनी मंडळाला भजनी साहित्य पुरवठा करणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २०/११/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

**सही/-**
**श्रीम. रक्ष्मी रविंद्र शिंदे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

**सही/-**
**सौ. गौरी महादेव गडगे**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

## ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
**कार्यालय : मु.वाशिवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

जा. क्र ३०४/२०२३ — दिनांक २१/११/२०२३

### ई - निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरिता ग्रामनिधीतून ग्रामपंचायत हद्दीत दिशादर्शक फलक बसविणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २०/११/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

**सही/-**
**श्रीम. रक्ष्मी रविंद्र शिंदे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

**सही/-**
**सौ. गौरी महादेव गडगे**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

## ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
**कार्यालय : मु.वाशिवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

जा. क्र ३०३/२०२३ — दिनांक २१/११/२०२३

### ई - निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरिता १० टक्के महिला व बालक्ल्याण निधीतून ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडीतील बालकांना, स्तनदा माता व गरोदर मातांना प्रोटीन पावडर पुरवठा करणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २०/११/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना / जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

**सही/-**
**श्रीम. रक्ष्मी रविंद्र शिंदे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

**सही/-**
**सौ. गौरी महादेव गडगे**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/१९१३/२०२३-२४ — दिनांक : २३/११/२०२३

### जाहिर ई- निविदा सुचना क्र. ७४/२०२३-२४

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मानव पार्क ते दिप पुष्प बिल्डींग येथे पाण्याचा निचरा होण्यासाठी बंदिस्त गटार बांधणे करणे कामाकरिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना कार्यक्रम व न.पा फंडातून मंजूर असलेल्या विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २८/११/२०२३ ते दि. ०४/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आहे. सदरची ई-निविदा दि. ०५/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील. निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

## परिशिष्ट क्र. १६
**(उपविधी क्र. ३५ अन्वये )**
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**
**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र..... धारण करणाऱ्या श्री/पुष्पलता शिवराम पाटील, उरण यांचे तारीख ०२/०३/२०२३ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मार्गणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या / हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी १२.०० ते दुपारी ४.०० पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक : २२/११/२०२३.**

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**सेक्टर २,नवीन पनवेल**

## परिशिष्ट क्र. १६
**(उपविधी क्र. ३५ अन्वये )**
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**
**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र..... धारण करणाऱ्या श्री/अहमद इस्माईल लंबाते, कळवा,ठाणे यांचे तारीख १४/०९/२०१३ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मार्गणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या / हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० ते दुपारी ४.०० पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक : २२/११/२०२३.**

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**सेक्टर २,नवीन पनवेल**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८७/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील निवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील निवासी वसाहतीतील विद्यमान सेप्टिक टाकी व ड्रेनेज नेटवर्क बदलणे, कोसळलेल्या कंपाऊंड भिंतीची पुनर्बांधणी करणे. | ₹ २०,८५,०३०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २४/११/२०२३ ते दिनांक ०८/१२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २८/११/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ३०/११/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## खुली निवीदा सूचना

जा. क्र ३६९
दिनांक २४/११/२०२३

**ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली**
**ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली खुली निवीदा सूचना क्रं. २०२३-२०२४**
**प्रथम प्रसार दि.२०/११/२०२३**

ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली ता. पनवेल जि. रायगड येथील ग्रामनिधी व १५ वित्त आयोग अंतर्गत खालिल प्रमाणे विकास कामे करणेची आहेत. सदरचे काम करणेसाठी अनुभवी शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन विकासकांमाच्या जाहीर मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाच्या निविदा दिनांक २४/११/२०२३ ते दि.०१/१२/२०२३ पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय जांभिवली येथे (सुटटीचा दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि. ०१/१२/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता ग्रामपंचायत सभासद समितीचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे जांभिवली येथे श्री. काशिनाथ बामा कोंडीलकर ते श्री. मंगेश बाळू भोईर यांच्या घरापर्यत पाईप गटार तयार करणे. | १६३७८९/- | १६३८/- | ६ महिने |
| २ | मौजे जांभिवली येथे श्री. बाळकृष्ण राघो कोंडीलकर ते श्री. मंगेश बाळू भोईर यांच्या घरापर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | ११२४६३/- | ११२५/- | ६ महिने |
| ३ | मौजे जांभिवली येथे श्री. प्रविण चंद्रकात कोंडीलकर ते श्री. महेश मारूती कोंडीलकर यांच्या घरापर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | ४८८३८३/- | ४८८४/- | ६ महिने |
| ४ | मौजे जांभिवली येथे श्री. कृष्णा राम कोंडीलकर ते होळीमाल पर्यत पायऱ्या बांधकाम करणे. | १०२७९०/- | १०२७/- | ६ महिने |
| ५ | मौजे जांभिवली येथे श्री. रूपेश गजानन कोंडीलकर ते श्री. शांताराम काथोर कोंडीलकर यांच्या घरापर्यत पायऱ्या बांधकाम करणे. | ७३७६३/- | ७३८/- | ६ महिने |
| ६ | मौजे जांभिवली येथे श्री. योगेश गोविंद माळी ते श्री. गणेश नाथा कोंडीलकर यांच्या घरापर्यत गटार तयार करणे. | २७८०७९/- | २७८०/- | ६ महिने |
| ७ | मौजे जांभिवली येथे श्री. बळीराम रामभाऊ कोंडीलकर ते श्री. जगदीश धोंडीराम पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे | २९०२०८/- | २९०२/- | ६ महिने |
| ८ | मौजे जांभिवली येथे श्री. तुकाराम पदू कॉडीलकर यांच्या घरापर्यत पायऱ्या बांधकाम करणे. | १९६२८०/- | १९६२/- | ६ महिने |
| ९ | मौजे जांभिवली येथे श्री. तुकाराम पदू कॉडीलकर ते श्री. मच्छींद्र नारायण माळी यांच्या घरापर्यत पाईप गटार तयार करणे. | २१११८०/- | २१११/- | ६ महिने |
| १० | मौजे जांभिवली येथे श्री. बळीराम रामभाऊ कोंडीलकर ते श्री. बाळकृष्ण राघो कोंडीलकर यांच्या घरापर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे | ७४६००/- | ७४६/- | ६ महिने |
| ११ | मौजे घेराकिल्ला माणिकगड येथे श्री. दामू वाघ ते गणपती विसर्जन घाट पर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | २८९९६८/- | २९००/- | ६ महिने |
| १२ | मौजे घेराकिल्ला माणिकगड येथे श्री. परशुराम वाघ ते गणपती विसर्जन घाट जानु निरगुडा यांच्या शेती पर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | ३४९८२२/- | ३४९८/- | ६ महिने |
| १३ | मौजे घेराकिल्ला माणिकगड येथे श्री. नामदेव खडके ते नदी पर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | ३९०७१३/- | ३९०७/- | ६ महिने |
| १४ | घेराकिल्ला माणिकगड येथील समाज मंदीर दुरूस्ती करणे. | ४९९९७८/- | ५०००/- | ६ महिने |
| १५ | मौजे कराडे बुद्रुक येथे श्री. रविंद्र पेळणेकर ते श्री. कृष्णा बेकावडे यांच्या घरापर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | १९२४३८/- | १९२५/- | ६ महिने |
| १६ | मौजे कराडे बुद्रुक येथे श्री. धर्मराज शिर्के ते मेन रोड पर्यत गटार तयार करणे. | ११४१६७/- | ११४२/- | ६ महिने |
| १७ | मौजे कराडे बुद्रुक येथे श्री. अशोक शिर्के ते श्री. गणेश शिर्के यांच्या घरापर्यत रस्ता कॉकीटीकरण तयार करणे. | १७३०४३/- | १७३०/- | ६ महिने |
| १८ | मौजे कराडे बुद्रुक येथे श्री. निलेश जाधव ते श्री. किसन गोडीवले यांच्या घरापर्यत गटार तयार करणे. | ३८२३६६/- | ३८२४/- | ६ महिने |
| १९ | मौजे कराडे बुद्रुक येथे अंतर्गत रस्ता व गावदेवी मंदीर शेड तयार करणे. | २८००८२/- | २८००/- | ६ महिने |
| २० | मौजे कराडे बुद्रुक मुख्य रस्ता ते श्री. सचिन शिर्के यांच्या घराशेजारील मोरी व रस्ता तयार करणे. | १२८९७१/- | १२९०/- | ६ महिने |
| २१ | मौजे जांभिवली येथील विसर्जन घाट रस्ता कॉकीटीकरण करणे. | ६१६७७१/- | ६१६८/- | ६ महिने |
| २२ | मौजे जांभिवली येथे श्री. अंनता शंकर कॉडीलकर ते मरीआई मंदीरा पर्यत गटार तयार करणे. | ९४०६८१/- | ९४०६/- | ६ महिने |
| २३ | मौजे जांभिवली येथे श्री. गणेश महादू म्हस्कर ते मरीआई मंदीरा पर्यत गटार तयार करणे. | ५७६५७४/- | ५७६५/- | ६ महिने |
| २४ | मौजे जांभिवली येथे मरीआई मंदीरा ते ओहोळा पर्यत गटार तयार करणे. | २११९०९६/- | २११९०/- | ६ महिने |
| २५ | मौजे कराडे बुद्रुक येथे श्री. अशोक शिर्के ते श्री. लक्ष्मण आवळे यांच्या घरा पर्यत गटार व रस्ता तयार करणे. | ५७२७३०/- | ५७२७/- | ६ महिने |
| २६ | मौजे कराडे बुद्रुक येथे श्री. धोंडू कोंडे ते श्री. अविनाश जाईलकर यांच्या घरा पर्यत आरसीसी गटार तयार करणे. | ७५३८९६/- | ७५३८/- | ६ महिने |

**अटी व शर्ती :-**

अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय जांभिवली येथे कार्यालयीन वेळेत बघता येतील. सदर अटी व शर्ती अधिन राहून विकास कामे करणे बंधन कारक आहे.

**सही/-**
**सौ. अर्चना संतोष देशमुख**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ. रिया रविंद्र कोंडीलकर**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

# नवी मुंबई परिसरात रक्ताचा तुटवडा

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी सुट्ट्यांमुळे राज्यात सर्वच ठिकाणी रक्त तुटवडा जाणवत आहे. निगेटिव्ह ग्रुपचे रक्त जवळपास संपल्यात जमा आहे. याची गांभीर्याने दखल घेत नियमित रक्तदान शिबिर आयोजित करणाऱ्यांना लवकरात लवकर मोठ्या प्रमाणात शिबिरे घेण्याचे आवाहन राज्य रक्त संक्रमण परिषदेने केले आहे. खास करून मुंबई, नवी मुंबई परिसरांतील रुग्णालयांत मोठ्या प्रमाणावर रक्त तुटवडा जाणवत आहे. याचा सर्वाधिक फटका रुग्णांना बसत असून त्यांच्या नातेवाईकांची सतत धावपळ होत आहे.



समाजसेवा भावनेतून रुग्णसेवा करणाऱ्यांना आता बहुतांश फोन हे रक्त मागणीसाठी खणखणत आहेत. राज्यभरातील रक्तसाठा केवळ २५ हजार युनिट शिल्लक असून हा साठा आठ-दहा दिवस पुरेल एवढा आहे. मात्र मुळातच रक्त तुटवडा असल्याने रक्तसाठा कधीही संपू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. हीच अवस्था मुंबई परिसराची (एमएमआरडीए) असून मुंबई क्षेत्रात या परिसरात चार हजार २८० युनिट्स शिल्लक आहे.

यात 'ओ निगेटिव्ह' रक्तगटाची केवळ ९८ युनिट्स शिल्लक आहे तर सर्वात कमी एबी निगेटिव्हचे केवळ ३१ युनिट्स शिल्लक आहेत. प्रत्येक वेळी सुटचांमध्ये ही परिस्थिती उद्भवते. सुट्ट्यांत रक्तदाते मिळत नाहीत. अनेक रक्तपेढ्यांमध्ये अडवणूक अथवा अतिरिक्त पैशांची मागणी केली जाते, तर अनेक ठिकाणी स्वतःहून

## दिवाळी सुट्ट्यांमुळे उद्भवली परिस्थिती

मदतीचे हात पुढे येतात असे अनुभव रक्तासाठी धावपळ करणाऱ्या अनेकांनी सांगितले. कर्करुग्णांवरील उपचारादरम्यान रक्ताची सर्वाधिक गरज भासते.

दरम्यान, एमएमआरडीए क्षेत्रात ३० पेक्षा अधिक कर्करोगावर उपचार करणारी रुग्णालये असून त्यांना रोज किमान ६० ते ७० प्लेटलेट्स (आर.डी.पी. आणि एस.डी. पी.मिळून) लागतात आणि सध्या केवळ शिल्लक आहेत त्या ७८१ युनिट्स त्यात एसडीपी केवळ ५८ युनिट्स शिल्लक आहे. याबाबत अनेक रुग्णालयांतील रक्तपेढीशी संपर्क साधला, मात्र नेमका रक्तसाठा किती आहे हे सांगण्यास त्यांनी असमर्थता दर्शवली.

> **रक्तदान शिबिराला सर्वाधिक प्रतिसाद राजकीय नेत्यांचा मिळत असतो, मात्र सुट्ट्यांच्या दरम्यान राजकीय नेते मंडळीही रक्तदान शिबिरांचे फार क्वचित आयोजित करतात. याचा फटका निश्चितच रुग्णांना बसतो.**
> **-प्रसाद अग्निहोत्री, रुग्णसेवक**

दरम्यान, नोव्हेंबरच्या अखेरपर्यंत परिस्थिती पूर्ववत होईल, अशी आशा राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. महेंद्र केंद्रे यांनी व्यक्त केली.

# शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष दाखवत एक कोटीची फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सट्टा बाजार अर्थात शेअर मार्केट हे गुंतवणुकीचा चांगला पर्याय आहे. त्याचा अभ्यास आवश्यक असल्याचे नियमित गुंतवणूक सांगतात, मात्र असाच अभ्यास करून आम्ही टिप्स देतो, शिवाय शेअर मार्केट मध्ये कशी गुंतवणूक करायचे हे शिकवतो सांगत एका व्यक्तीची तब्बल एक कोटी २३ लाख ६४ हजार ५४ रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

संदीप खुराणा असे यातील फिर्यादीचे नाव असून ते एका इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीत भागीदार आहेत. त्यांना ६ ऑगस्टला फोन आला आयसीआयसीआय बँकेतून मुमताज मिमो बोलते




असे समोरील व्यक्तीने सांगितले व शेअर मार्केटमध्ये योग्य ठिकाणी गुंतवणूक करण्यासाठी टिप्स देणे, मार्गदर्शन करणे आदी माहिती हे काम करत असल्याचे सांगितले. संदीप यांनी यापूर्वी शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक केलेली असल्याने त्यांनाही ही संधी वाटली व त्यांनी होकार दिला.

काही वेळातच त्यांना Stock Market Investor Alliance VIP ७ या व्हॉट्सअॅप समूहात घेण्यात आले ज्याचे ॲडमिन एलिझा नावाचे व्यक्ती होते. इथून पुढे थोडी थोडी गुंतवणूक कशी करावी याचे ऑनलाईन शिकवणी वर्ग सुरू झाले. त्यानंतर लिंक पाठवणे, पैसे भरण्यास सांगणे सुरू झाले. यात संदीप यांच्या समवेत एकूण चार व्यक्तींशी ऑनलाईन आणि मोबाईलवर संपर्क आला. ६ ऑगस्ट ते १३ नोव्हेंबरदरम्यान संदीप यांच्या कडून एकूण चाळीस वेळा एक लाख ते १४ लाख अशा रकमा घेतल्या. असे एकूण एक कोटी २३ लाख ६४ हजार ५४ रुपये भरले.

मात्र दर वेळी विविध कर भरा, मोठी रक्कम असल्याने थोडे थांबा, अशी चालढकल अनेक दिवस केली गेली. आपली फसवणूक होत असल्याच्या संशयाने संदीप यांनी गुंतवणूक केली ती रक्कम परत करा असा तगादा सुरू केला. त्यामुळे समोरील व्यक्तीने संपर्कच तोडाला. शेवटी संदीप यांनी दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी त्या चार अनोळखी लोकांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंद केला आहे.

## निवडक

### बारवई येथे अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर बारवई या ठिकाणी दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात अनय्या दोडाघटा रंगप्पा याचा मृत्यू झाला. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोकरपाडा येथे राहणारे अनय्या दोडाघटा रंगप्पा हे सकाळच्या सुमारास स्कूटीवरून पनवेलला जात होते. ते बारवई-पोयंजे येथे आल्यावर त्यांच्या स्कूटीला एका भरधाव वाहनाने धडक दिली. घटनेनंतर वाहनचालक फरार झाला आहे. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ओवळे येथे घराला आग

**पनवेल :** तालुक्यातील ओवळे गावात घराला आग लागल्याने छप्पर पूर्णपणे जळून खाक झाल्याची घटना घडली असली तरी, ही आग कशामुळे लागली हे समजू शकलेले नाही. ओवळे येथील बाणासुर म्हात्रे यांच्या घराला अचानकपणे आग लागली. या आगीमध्ये घराचे छप्पर पूर्णपणे जळून खाक झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे कारण समजू शकलेले नाही. या आगीच्या नुकसानीचा पंचनामा करण्यात आला आहे.

### रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा

**रसायनी :** आपटा गावतील रिक्षाचालक मनोहर पाटील यांच्या रिक्षात गावातील एका महिलेची पर्स विसरली होती. मनोहर पाटील घरी आल्यावर रिक्षेची साफसफाई करताना ही पर्स त्यांना दिसली. यामध्ये पैसे होते तत्काळ त्यांनी गावातील एका रिक्षाचालकास बरोबर घेऊन गावातील त्या महिलेच्या घरी जाऊन रोख रक्कम असलेली पर्स परत केली. मनोहर पाटील यांच्या प्रामाणिकपणाचे संबधित महिलेने कौतुक करून आभार मानले. तसेच गावातही त्यांचे कौतुक झाले.

# वाशीमध्ये रस्ते, पदपथ बळकावणाऱ्या गॅरेज चालकांवर कारवाई



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी येथे रस्ते आणि पदपथ बळकावणाऱ्या गॅरेज चालकांवर गुन्हा नोंद करण्याची कारवाई वाशी वाहतूक शाखेच्या पोलिसांच्या वतीने चालू करण्यात आले आहे. त्यामुळे वाशीतील गॅरेज चालकांचे धाबे दणाणले आहेत.

वाशी विभागामध्ये सेक्टर १७ त्याचबरोबर सेक्टर २९, आणि अन्य ठिकाणी सार्वजनिक रस्ता आणि पदपथ यांवर दुचाकी, रिक्षा आणि चार चाकी वाहने दुरुस्त केली जातात. यामुळे पादचाऱ्यांच्या जीवाला धोका देखील निर्माण होत असतो. पादचार्यांना पदपथा ऐवजी रस्त्यावरून चालावे लागल्याने अनेकदा किरकोळ अपघातांनाही सामोरे जावे लागले आहे.

परिणामी, याची गंभीर नोंद घेत नवी मुंबईचे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी अशा बाबींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार वाशी विभागाचे वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांनी वाशी सेक्टर १७ परिसरातील गोल्डन पंजाब हॉटेलचे बाजुस सिदधी कार गॅरेजचे समोर रोडवर दुरुस्तीसाठी उभी असलेली कार ताब्यात घेतली. तसेच या प्रकरणी गुलझार मुजीब शेख सह अन्य एकावर गुन्हा नोंद केला आहे.

रस्त्याने येणाऱ्या जाणारे पादचारी तसेच वाहनांना येण्या-जाण्यास अटकाव होणे. तसेच त्यांना इजा निर्माण होईल अशा पध्दतीने ही कार उभी करून ती दुरूस्त केली जात होती म्हणून हा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यापुढेही ही कारवाई अधिक प्रभावीपणे करण्यात येणार असल्याची माहिती कदम यांनी दिली.

# पनवेलमध्ये बेकायदा टपऱ्यांवर धाड

## अन्न सुरक्षा विभागाने केला गुटखासाठा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एसटी स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन परिसरातील बेकायदा टपऱ्यांवर अन्न सुरक्षा विभागाने धडक कारवाई करीत मोठ्या प्रमाणात गुटखासाठा हस्तगत केला. या कारवाईमुळे बेकायदा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पनवेल एसटी स्टॅन्ड परिसर व रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या बेकायदा टपऱ्यांवर महाराष्ट्रात विक्री करण्यास बंदी असलेल्या विविध प्रकारचे गुटखे, पान मसाला, सुगंधित तंबाखू याची खुलेआम विक्री होत असल्याच्या तक्रारी अन्न सुरक्षा विभागाकडे आल्या होत्या. त्यानुसार अन्न सुरक्षा अधिकारी विक्रम निकम यांच्या



मार्गदर्शनाखाली आलेल्या पथकाने या भागात छापे टाकून बेकायदे विक्री करणारे पप्पू प्रजापती (वय ५०), प्रीसु गुप्ता(वय २४), शिव पूजन पटेल (वय २२), सुभाष गुप्ता (वय ४०), शिवबाकु चौरसिया (वय ३७) व सतीश देवाडिगा (वय ४१) यांच्या पान टपऱ्यांवर छापे टाकून जवळपास ५९८२८ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

त्यांच्याविरोधात भादवि कलम १८८, २७२, २७३,३२८.३४ सह प्रतिबंधित अन्नपदार्थाचे वितरक व पुरवठादार यांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, नियम व नियमने २०११ चे कलम २६ (१). २६ (२)(११), कलम २६ (२) (आयव्ही) तसेच कलम २७ (३) (व ) २७ (३) (श) सहवाचन कलम ३० (२) (र) सहयाचन मा अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसुचना कमांक असुमाअ./अधिसुचना-४९६/७ दिनांक १८/०७/२०२३ शिक्षा कलम ५९ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शाळेत बदनामी झाल्याने विद्यार्थिनीने संपविले जीवन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे वसाहतीमध्ये नववी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने घरातील गॅलरीमध्ये गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. ही घटना १ नोव्हेंबरला सायंकाळी सहा वाजता घडली. या घटनेमध्ये विद्यार्थीनीच्या आईने दोन दिवसांपूर्वी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबानंतर संबंधित शाळेतील धक्कादायक प्रकार उजेडात आला.

करंजाडे येथील सेक्टर २ मधील एका इमारतीमध्ये १४ वर्षांच्या मुलीने ओढणीने गळफास घेतला. कामोठे एमजीएम रुग्णालयात यानंतर मुलीला घेऊन गेल्यावर तेथील डॉक्टरांनी मुलीचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. पनवेल शहर पोलिसांनी मृत्यूनंतर केलेल्या चौकशीत धक्कादायक बाब समोर आली.

कामोठे येथील ज्या शाळेत मृत मुलगी शिकत होती. तिचा काही दिवसांपूर्वी वर्गातील मुलांनी पिडीत मुलीच्या पाठीवर हात लावतानाचा फोटो मोबाईलमध्ये काढला होता. त्याखाली अतिशय वाईट शब्दातील पीडित मुलीला बदनाम करणारे मेसेज लिहून हा मेसेज शाळेतील इतर मुलांच्या मोबाईलवर व्हायरल केला होता. पीडित मुलीच्या आईने याबाबत तक्रार केली. पुन्हा असे होणार नाही असे मुख्याध्यापिका आणि फोटो काढणारे व मोबाईलवरून पसरविणाऱ्या पालकांनी शाश्वती दिल्यानंतरही वर्गात पीडित मुलगी गेल्यावर तिला या फोटोबद्दल इतर मुलांकडून विचारणा करण्यात आली.

अखेर या सगळयाला कंटाळून पीडित मुलीने जिवनयात्रा संपविण्याचा निर्णय घेतला. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून मुलीची बदनामी केल्यामुळे दोन मुलांवर गुन्हा दाखल केला आहे.

# खारघर येथे सोन्याची चैन लांबविली

**पनवेल :** दुचाकीवरून आलेल्या एका महिलेने पादचाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन साखळी खेचून पसार झाल्याची घटना तालुक्यातील पेठपाडा परिसरात घडली आहे .

मेट्रो रेल्वे प्रवास करून एक महिला घरी पायी जात असताना दुचाकीच्या मागील सीट वर बसलेल्या लाल रंगाची कुर्ती व पांढऱ्या रंगाची ओढणी असा पेहराव केलेल्या महिलेने सदर पादचारी महिलेच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाची सोनसाखळी खेचून पोबारा केला आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# दोन तरुणांनी घडविली दिडशे भाविकांना मोफत तीर्थयात्रा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ गावातील अक्षय गजानन पाटील व प्रवीण रोहिदास पाटील या दोन तरुण सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून नुकतेच दिल्ली, इंदौर, उज्जैन व वैष्णोदेवी अशा सहा दिवसीय मोफत तिर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यात नेरूळ गावातील पाटील कुटुंबातील सुमारे दिडशे भाविक सहभागी झाले होते. मुंबई-दिल्ली विमान प्रवासाचा तसेच हॉटेल एसेंसियल या पंच तारांकित हॉटेलमध्ये वास्तव्याचा आनंद यात भाविकांना घेता आला.

दरम्यान, प्रवीण पाटील व अक्षय पाटील या तरुण सामाजिक कार्यकर्त्यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या उपक्रमाबद्दल माहिती देताना अक्षय पाटील म्हणाले की, माझे मातुल आजोबा, मामा यांच्या सामाजिक जाणीवेचा वारसा मला मिळालेला आहे. त्यामुळे, मी माझ्या कुटुंबाचं काही तरी देणं लागतो याची लहानपणा पासूनच मला जाणीव आहे. ही जाणीव या आयोजनामागे आहेच शिवाय माझ्या पाटील कुटुंबाचं प्रेम, सहकार्य, मार्गदर्शन आणि आशीर्वादाची शिदोरी माझ्या पाठीशी आहे. म्हणूनच एवढी मोठी तीर्थयात्रा आम्ही आयोजित करू शकलो आणि कुलदैवताच्या कृपेनं ती यशस्वीही होऊ शकली. म्हणूनच या तिर्थयात्रेचे आयोजक आम्ही जरी असलो तरीही आम्ही केवळ निमित्त असून याचं सारं हे माझ्या पाटील कुटुंबाचंच आहे असे मी मानतो.

तर या तिर्थयात्रेच्या नियोजनासाठी तीर्थयात्रेत सहभागी झालेल्या आणि सहभागी होऊ न शकलेल्या पाटील कुटुंबातील सर्वच सदस्यांनी आपापल्या परीने चांगलं योगदान दिलं असून यात विशेषतः रत्नाकर पाटील, प्रभाकर पाटील, दत्तात्रेय पाटील, प्रल्हाद पाटील, देवानंद पाटील, भार्गवी पाटील, कौस्तुभ पाटील, सौरभ पाटील, तन्मय पाटील, भाग्येश पाटील आदींनी विशेष मेहनत घेतल्यामुळेच ही तीर्थयात्रा यशस्वी होऊ शकल्याचे आयोजक प्रवीण पाटील यांनी शेवटी सांगितले.



# काव्योत्सवात आज अवतरणार कोकण

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण म्हटले की डोळ्यासमोर साकारते निसर्गसौंदर्याचे चित्र. कोकणची भौगोलिक रचना, साहित्यिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि कोकणची माणसं काव्योत्सवातून सादर करण्याचा आगळावेगळा प्रयत्न केला आहे शिवसेना स्वातंत्र्यवीर सावरकरनगर आयोजित कोकण उत्सवात. येत्या २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडे पाच वाजता सावरकर नगर येथील ठामपा शाळा क्रमांक १२० चे मैदान येथे हा कार्यक्रम होणार आहे.

आम्ही कला प्रतिष्ठानच्या ११ कवी-कवयित्री यांनी या काव्योत्सवात सहभाग घेतला आहे. त्यात विनोद पितळे, रामदास खरे, विजय जोशी, डॉ. सतीश कानविंदे, राजेंद्र ठाकूर, मनमोहन रोगे, डॉ. प्रतीक्षा बोर्डे, मनिषा चव्हाण, आश्लेषा राजे, सुप्रिया हळबे आणि हर्षदा अमृते यांचा समावेश आहे.

कवितांसह कोकण विषयक रंजक माहिती, मालवणी कविता, गाऱ्हाणे, देवस्थाने, साहित्यिक, फळे, कोकणी इरसाल नमुने, सण-उत्सव-लोककला, परंपरा, कलाकार, गडकिल्ले, समुद्र, किनारे, पर्यटन, निसर्ग संपदा, खाद्यसंस्कृती आणि समृद्धी यावर सुबक विवेचन या काव्योत्सवात होईल.

या ज्ञान-मनोरंजन आणि साहित्यिक कार्यक्रमास ठाणेकर रसिकांनी आणि साहित्यप्रेमी कोकणवासीयांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक बारटक्के फाउंडेशनचे संचालक, माजी नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी केले आहे.

# लायन्स क्लबतर्फे गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप




**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमच्या माध्यमातून विविध सेवाभावी उपक्रम सातत्याने राबवले जातात. त्यानुसार क्लबच्या वतीने चार गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप नुकतेच करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट जी एस टी चेअरमन प्रवीण सरनाईक हे उपस्थित होते. सरगम क्लबच्या अध्यक्षा स्वाती गोडसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

प्रवीण सरनाईक यांनी सांगितले की, सरगम क्लब हा जरी नवीन असला तरी अतिशय उत्कृष्ट काम करत असून विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करत आहे हे कौतुकास्पद आहे. यापुढेदेखील असेच काम पनवेल सरगम क्लब करत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ज्या विद्यार्थ्यांना सायकल मिळाल्या त्यांच्या चेहऱ्यावर अतिशय आनंद दिसत होता.

या वेळी श्रुती सरनाईक, अशोक गिल्डा, संजय गोडसे, शोभा गिल्डा, तृप्ता गिल्डा तसेच मानदा पंडित, अलकेश शहा, प्रेमेंद्र बहिरा, जयेश मणियार आदी लायन्स क्लब ऑफ पनवेलचे सदस्य उपस्थित होते.

## निवडक

### मुलीच्या वाढदिवशी अंगणवाडीची स्थापना



**पाली** : सुधागड तालुक्यातील ताडगाव ग्रामपंचायत हद्दीतील दुधनी येथे नुकतीच मिनी अंगणवाडीची स्थापना करण्यात आली आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे यांनी आपली मुलगी स्वरांजली ज्योती सचिन साठे हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मिनी अंगणवाडीची सुरुवात केली आहे. त्यामुळे आता येथील लहानग्यांचे शिकणे सुकर व मोफत झाले आहे. यासाठी स्वरदिव्य वेल्फेअर फाउंडेशन आणि ताडगाव सरपंच करुणा भिमचंद्र साठे यांची मदत लाभली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्वर दिव्य वेल्फेअर फाउंडेशनचे डायरेक्टर दिलीप सोनुने, पुणे, ताडगाव सरपंच करुणा भिमचंद्र साठे, उपसरपंच संजय चौधरी, सदस्य मंगेश देशमुख, रघुनाथ घारे, कृषी अधिकारी श्री निरगुडे, माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ताडगाव ग्रामपंचायतीमधील नागरिक उपस्थित होते.

### एकवीरा आईचा पालखी सोहळा

**धाटाव** : चांद्रसेनिय कायस्थ प्रभू संस्था आणि सीकेपी उत्कर्ष संस्था यांच्यासह पुण्यातील पुणे सीकेपी फॅमिली पब्लिक ट्रस्ट व सीकेपी समाज संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा एक दिवस कायस्थांचा.. एकवीरा देवीचा पालखी सोहळा शनिवारी (दि. २५) कार्ला येथे आयोजन करण्यात आले आहे. सदस्यांनी आदल्या दिवशी शुक्रवारी येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी विकास देशमुख, तुषार राजे, जयदीप कोरडे, निलेश गुप्ते, अशोक कुळकर्णी, मंदार कुळकर्णी, भूषण देशपांडे आदी बंधू नियोजनात परिश्रम घेत असून इच्छुक बंधू भगिनींनी अधिक माहितीसाठी (९६१९१८५००४) व (९८२०५१८८६३) या क्रमांकावर संपर्क साधावे असे आवाहन करण्यात आले आहे.



**रोहा : शहरात कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठल रखुमाई मंदिरात महापूजा ज्येष्ठ पत्रकार विजय देसाई यांचे हस्ते सपत्नीक करण्यात आली.**

# काशिद किनारी सुरक्षा व्यवस्थांमध्ये वाढ करणार

## वाढत्या अपघातांमुळे नवनिर्वाचित सरपंचांचा निर्णय

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील काशिद समुद्रकिनारी दरवर्षी लाखोंच्या संख्येने पर्यटक येत असतात. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी समुद्रकिनारी जीवरक्षकांची संख्या वाढवणार असल्याचे आश्वासन ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच संतोष जयराम राणे यांनी केले आहे.

काशिद ग्रामपंचायतीची निवडणूक नुकतीच झाली असून येथे शिवसेनेचे थेट सरपंच म्हणून संतोष राणे हे बहुमताने निवडून आले आहेत. आगामी काळात ग्रामपंचायतीच्या विकासासाठी आपली भूमिका व्यक्त करताना ते बोलत होते. या वेळी सरपंच संतोष राणे यांनी सांगितले की, काशिद येथे सुट्टीच्या दरम्यान हजारो पर्यटक येत असतात. त्यांची सुरक्षितता वाढवण्यासाठी सध्या काशिद ग्रामपंचायतीकडे तीनच जीवरक्षक आहेत. आगामी काळात जीवरक्षक संख्या १० करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीमार्फत जीवरक्षकांना दर महिन्याला पगार दिला जातो. जीवरक्षकांची संख्या वाढवल्याने पर्यटक सुरक्षित राहणार असून पाण्यात बुडून मृत्यूची संख्या घटणार आहे. त्याचप्रमाणे बुडणाऱ्या पर्यटकांना तातडीची मदत मिळण्यासाठी वॉटर स्पोर्ट बोटीमधील स्पीडबोटीचीसुद्धा मदत घेत असल्याचे त्यांनी सांगितले.



काशिद येथे पर्यटक मोठ्या संख्येने वाहने घेऊन येतात. सध्या वाहनांची संख्या वाढली आहे व पार्किंगला जागा कमी पडत असल्याने वाहने रस्त्यावरसुद्धा पार्किंग करावी लागतात. यासाठी लवकरच वन अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन वाहन पार्किंगसाठी आगाऊ जागा मिळवण्याचा माझा प्रयत्न असणार असल्याचे राणे यांनी सांगितले आहे.

काशिद समुद्रकिनारी आमच्या गावातील लोक विविध व्यवसाय करून पर्यटकांना विविध सेवा पुरवत असतात. व्यवसाय करणाऱ्या या लोकांना कायमस्वरूपी जागा देण्याचा मानससुद्धा त्यांनी व्यक्त केला आहे.

आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून काशिद समुद्रकिनाऱ्याचे सुशोभिकरण करणार आहे. गावाच्या विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून ग्रामपंचायतीचा विकास करणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. काशिदमध्ये सेल्फी पॉईंट विकसित करणे मुलांसाठी उद्यान व ज्येष्ठ नागरिकांना नाना नानी पार्क बनवणार असल्याचे राणे यांनी सांगितले आहे.

## चौक ग्रामीण रुग्णालयात नवजात शिशू संगोपन कार्यशाळा

**चौक : प्रतिनिधी**

ग्रामीण रुग्णालय चौक येथे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सविता कालेल यांच्या मार्गदर्शनाखाली नवजात शिशू संगोपन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी ग्रामीण रुग्णालय व खासगी दवाखान्यात प्रसुती झालेल्या माता उपस्थित होत्या.



वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल यांनी नवजात बालकांचे संगोपन, त्यांचा आहार व नवजात बालकांची देखभाल याचबरोबर नवजात बालकांना झोपवण्याची पद्धत, स्तनपान, नवजात बालकांच्या मातेचा आहार यावर मार्गदर्शन करून शिशू मृत्यूदर शून्य करण्यासाठी सर्व मातांनी काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

ग्रामीण रुग्णालय चौक येथे २० नोव्हेंबरपर्यंत १९ प्रसूती नैसर्गिक झाल्याचे सांगण्यात आले. समुपदेशक अशोक लोंढे यांनी नवजात बालकांना लसीकरण, बालकांचे लसीकरण, कुटुंब नियोजन आणि जननी सुरक्षा योजना याविषयी माहिती दिली. डॉ. ओव्हाळ यांनीही शिशू संगोपन याविषयी सविस्तर माहिती दिली.

या वेळी डॉ. सोनावणे, डॉ. भाटकर, डॉ. नरवाडे, डॉ. राजन यादव, ग्रामीण रुग्णालय यांचे कर्मचारी, आरोग्य सेवा विभाग, अधिकारी, नवमाता उपस्थित होत्या.

## माणगावजवळ कोकण रेल्वेच्या धडकेने तरुणाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ते गोरेगाव रेल्वेस्थानकाच्या दरम्यान कोकण रेल्वेच्या धडकेने तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. २२) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची माहिती राम वेटू तेटगुरे यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.



माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील मृत प्रथमेश प्रकाश तेटगुरे (वय २३, रा. मुगवली) यास माणगाव बाजूकडून गोरेगाव बाजूकडे जाणारी कोचिवल्ली २०९३२ विकली एक्सप्रेस रेल्वेची इलेक्ट्रिकल पोल क्र. ३४/२६च्या जवळ आल्यावर धडक लागून या तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू प्रमाणे करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक आघाव हे करीत आहेत.

## चौकफाटा येथे सातत्याने वाहतूक कोंडी

### अवजड वाहने वळताना इतरांची होतेय गैरसोय

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ४वर चौक हद्दीत कर्जतवरून याच मार्गाने पुणे दिशेला अवजड वाहने वळवताना अपघात होण्याची शक्यता निर्माण होत आहे.

चौक येथून कर्जतला जाण्यासाठी हाच मार्ग आहे. पनवेल व चौककडून कर्जतकडे जाण्यासाठी लहान-मोठी वाहने जात असतात, परंतु कर्जतकडून खोपोली दिशेला जाताना अवजड वाहनांना कसरत करावी लागत असून सातत्याने वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.



राष्ट्रीय महामार्गावर नेहमीच वर्दळ असते. येथे असलेले सिग्नलदेखील काम करीत नाहीत. त्याचप्रमाणे या ठिकाणी एमआयडीसी परिसरत असल्याने सातत्याने अजवड वाहनांची वर्दळ सुरू असते.


या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित या रस्त्यावर वाहतूक पोलीस तैनात करावे, अशी मागणी प्रवाशांमधून जोर धरीत आहे.

## अलिबाग जिल्हा रुग्णालयात नवजात बालक कक्ष कार्यान्वित

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा रुग्णालयाच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या इमारतीच्या एनएचएम अंतर्गत अत्याधुनिक नवजात बालक कक्ष (एसएनसीयू) कार्यान्वित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी दिली आहे.

नवजात बालकांमध्ये होणारे आजार जसे कमी दिवसांच्या कालावधीत जन्माला आलेले बाळ, कावीळ, जन्मतः श्वास घेण्यास त्रास होणे, जन्मतः मातेच्या पोटात शी गिळणे, जन्मतः व्यंग असणे, आकडी



येणे अशा विविध स्वरूपाच्या आजारांवर उपचार केले जातात. मागील १० वर्षांच्या कालावधीत एसएनसीयूच्या माध्यमातून नऊ हजार ३५८ नवजात बालकांना नवजीवन मिळाले आहेत, तसेच अंदाजे दोन हजार कमी दिवसांची बालके बरी होऊन गेली आहेत.

येथे दर आठवड्याला नवजात बालकांची आरओपी (डोळ्यांची) तपासणी कानाची व ओएइ तपासणी एअमौयु केलेल्या संस्थांमार्फत करण्यात येते, तसेच पशु बॉर्न स्क्रिनिंग करण्यात येते. यामध्ये रक्तदोष आढळल्यास योग्य उपचार देण्यात येतात. पुढील संभाव्य धोके टाळण्यास मदत होते, तसेच जन्मजात व्यंग याचेदेखील रोग निदान करून डीईआयसी मार्फत पुढील संदर्भात सेवा व उपचार केले जातात.

आजपर्यंत याच फायदा अनेक नवजात बालकांना झाला आहे. त्यामुळे मृत्यूदर कमी होण्यास मदत झाली आहे. जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी असल्यामुळे सर्व तालुक्यामधून नवजात बालके उपचारकरिता येथे येत असतात.

यामध्ये नवीन एसएनसीयूची मान्यता पाच तालुके श्रीवर्धन, माणगाव, कर्जत, रोहा, महाड या ठिकाणी कार्यान्वित करण्याकरिता शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यापैकी सद्यस्थितीत सन २०२५-२६ वर्षाकरिता एका एसएनसीयूची मान्यता महाड येथे मिळाली आहे जेणेकरून तेथील नवजात बालकांना योग्यरितीने उपचार व आरोग्य सेवा मिळावी हा या मागचा उद्देश आहे.

अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे, बालरोग तज्ज्ञ डॉ. सागर खेदु, अधिसेविका अनिता भोपी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष पाटील, एसएनसीयू परिसेविका डॉ. प्रितम वर्सोलकर, बालरोग तज्ज्ञ परिचारिका, एसएनसीयू, अधिपरिचारिका तसेच स्वच्छता सेवक, सुरक्षारक्षक यांच्या सहकार्याने १० वर्षांचा कालखंड पूर्ण केला आहे.

## भिसेगावमध्ये आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत प्रेस क्लबच्या वतीने स्व. निर्मला दत्तात्रेय देशमुख यांच्या स्मरणार्थ आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने भिसेगावमध्ये मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात २८१ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन दत्तात्रेय तथा बंधू देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, रायगड प्रेस क्लबचे उपाध्यक्ष संजय मोहिते, पोलीस पाटील संजय हजारे, वसंत ठाकूर, नारी सामाजिक संस्थेचे सचिव विजय सातपुते, राकेश देशमुख आदी उपस्थित होते.

कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष ॲड. राहुल देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. सोनाली घाणेकर, डॉ. उन्नती पित्रोडा, डॉ. प्राची चावडे, डॉ. गायत्री कन्हाडकेकर, डॉ. अश्विनी राठोड, डॉ. सिद्धी लावंगरे, डॉ. हर्षदा राऊत यांच्यासह १५ डॉक्टर आणि १० आरोग्यसेवकांनी आरोग्य सेवा दिली.

डॉ. दत्ता रायभान गिराम, डॉ. ध्रुव दमानिया, थेरेफिस्ट रसिका घाणेकर अर्पिता पाटील यांनी रुग्णांच्या चामखीळ आणि भोवऱ्या तत्काळ काढण्यात आले, तर या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली. शिबिरात २८१ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

डॉ. अदिती गायकवाड, डॉ. आरती घाटे, सोपान गोरे, बिनीता घुमरे, आयेशा वाडकर, महेश क्षीरसागर, किरण पाटील, सोमनाथ ठोंबरे, ज्योती पाटील, वैशाली ठाकरे, वसुधा ठाकूर, दिव्या जोशी, रश्मी भानुशाली, तनिष्क सोलंकी, ज्योती कश्यप, मल्हार पवार, अजय गायकवाड, कांता हाबळे, गणेश पवार, ज्ञानेश्वर बागडे, अनिल गवळे, निशा गुप्ता आदी उपस्थित होते.


महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र. ६

ई निविदा सूचना क्र. ५९/२०२३-२०२४ (मुंबई) करीता

दिनांक १३/०९/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक खबरें आज तक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील केमिकल, न्यू केमिकल झोन व एल, एम, व्ही आणि टी ब्लॉकमध्ये आरसीसी बिल्टअप गटर्ससह सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे. |

सदर कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ३०/११/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# ऑस्ट्रेलियानंतर भारताची अफगाणिस्तानविरुद्ध टी-२० मालिका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विश्वचषक संपल्यानंतर जगभरातील क्रिकेट संघांनी द्विपक्षीय मालिकेसाठी तयारी सुरू केली आहे. एकीकडे भारतीय संघ ऑस्ट्रेलियन संघासोबत टी-२० मालिका खेळत आहे, तर दुसरीकडे असा संघ भारतात येणार आहे, ज्यांच्यासोबत भारताने आतापर्यंत एकही वनडे किंवा टी-२० मालिका खेळलेली नाही. हा संघ दुसरा कोणी नसून अफगाणिस्तान क्रिकेट संघ आहे. अफगाणिस्तानचा संघ पुढील वर्षी जानेवारीत भारत दौऱ्यावर येणार आहे.





भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात जानेवारीमध्ये तीन टी-२० सामन्यांची मालिका होणार आहे. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने या दौऱ्यासाठी मान्यता दिली आहे. या दौऱ्यात अफगाणिस्तान ११, १४ आणि १७ जानेवारीला तीन टी-२० सामने खेळणार आहे.

तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना ११ जानेवारी रोजी मोहाली येथे खेळवला जाईल. त्यानंतर दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे १४ आणि १७ जानेवारी रोजी इंदूर आणि बंगळुरू येथे होईल. दोन्ही देशांदरम्यान पहिल्यांदाच मर्यादित षटकांची मालिका होणार आहे. अफगाणिस्तान आणि भारताचे संघ केवळ आयसीसी स्पर्धा किंवा आशिया चषकादरम्यान मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये एकमेकांसमोर आले आहेत, तर आतापर्यंत दोन्ही संघांमध्ये केवळ एकच कसोटी सामना खेळला गेला आहे.

अफगाणिस्तानने अलिकडेच आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३साठी भारताचा दौरा केला, जिथे त्यांनी इंग्लंड, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेशविरुद्ध संस्मरणीय विजय नोंदवून गुणतालिकेत सहावे स्थान पटकावले होते. दोन्ही संघांमधील हेड-टू-हेड सामन्यांबद्दल बोललो, तर ते आतापर्यंत पाच टी-२० सामन्यांमध्ये आमनेसामने आले आहेत. त्यापैकी सर्व भारताने जिंकले आहेत.

### मालिकेचे वेळापत्रक

**पहिला सामना : ११ जानेवारी २०२४, मोहाली**
**दुसरा सामना : १४ जानेवारी २०२४, इंदूर**
**तिसरा सामना : १७ जानेवारी २०२४, बंगळुरू**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे वेट लिफ्टिंगमध्ये घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने नॅशनल महाविद्यालय बांद्रा व मुंबई विद्यापीठ स्पोर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २२) आयोजित केलेल्या इंटर झोनल वेटलिफ्टिंग टूर्नामेंटमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.



या वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील द्वितीय वर्षाचा विशाल पुजारी याने कांस्यपदक पटकाविले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे (समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता कक्ष) यांनी त्याचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर, फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत तसेच इतर सर्व सदस्यांचा या विद्यार्थ्याच्या यशामध्ये मोलाचा वाटा आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये कांस्यपदक मिळवल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



## उरणचे फुटबॉलपटू स्पेनमध्ये टूर्नामेंट खेळणार

**उरण : वार्ताहर**

स्पेनमध्ये जुनिअर गट फुटबॉल टूर्नामेंट पुढील वर्षी होणार आहे. या स्पर्धेत उरण येथील युईएस शाळेत शिकत असलेले व सेवेन स्टार फुटबॉल अकॅडमीत प्रशिक्षक प्रवीण तोगरे यांच्याकडे सराव करीत असलेले तीन खेळाडू सहभागी होणार आहेत.

फुटबॉल टूर्नामेंट पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात होणार आहे. या स्पर्धेत उरणमधील सोहन चेतन नवलगी, आर्य मंगेश पाटील व अथर्व निलेश म्हात्रे भारताचे प्रतिनिधित्व करतील. याबद्दल त्यांचे पालक, शिक्षक, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# पनवेल, उरणमधील गोशीन रियू कराटेपटूंची चमक

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथे गोशीन रियू कराटे असोसिएशन इंडियातर्फे ३५वी राष्ट्रीय स्पर्धा व ट्रेनिंग कॅम्पचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी बंगळुरू, चेन्नई, गुजरात, तामिळनाडू, रायगड, ठाणे या राज्यातून व जिल्ह्यातून विद्यार्थी आले होते. यात पनवेल, उरणमधील खेळाडूंनी पदके जिंकून चमकदार कामगिरी केली. त्यांची मलेशियात डिसेंबरमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शिहान वसंथन, साईशेठ, माजी नगरसेवक अजय बहिरा, लायन ग्रुपचे अध्यक्ष जितेंद्र फडके, उरण अध्यक्ष सुशील म्हात्रे यांच्या उपस्थितीत झाले.




उरण व पनवेलच्या खेळाडूंनी कुमिते व काता प्रकारात पदके पटकाविली. यामध्ये आर्या गावंड व श्लोक ठाकूर दोन सुवर्ण; अनिश पाटील, परेश पावसकर सुवर्ण व रौप्य; भार्गवी मोकल, साक्षी पंडित, वैदेही घरत, पियुष ठाकूर, नेत्रा प्रत्येकी सुवर्ण व कांस्य; स्वरा म्हात्रे, सुजीत पाटील, गोपाळ म्हात्रे सुवर्ण, नैतिक गावंड, शितल गणेशकर दोन रौप्य; वेदिका वेहले, सृष्टी सरोज, कार्तिकी पाटील, वेदा पाटील, अद्या ठाकूर, नैतिक गावंड, निकिता कोळी, वेदा ठाकरे, सोज्वल पावस्कर प्रत्येकी रौप्य व कांस्य; निमेश पाटील रौप्य; प्रिषा भोईर, आर्यन पाटील, हृद्वी म्हात्रे दोन कांस्यपदके जिंकून यश मिळविले. रोहित घरत याला एक गोल्ड मेडल, दोन सिल्व्हर मेडल मिळाले. या वेळी उपेंद्र माळी, रेश्मा माळी, विघ्नेश कोळी, निकिता कोली, शितल गणेशकर, सुलभा कोळी यांना फर्स्ट डिग्री ब्लॅक बेल्ट, तर राकेश म्हात्रे, परेश पावसकर विनय पाटील, अशोक वारली यांना सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला.

स्पर्धा सिंहान राजू कोळी यांनी आयोजित केली होती. कृष्णा पाटील, आनंद खारकर, गोपाळ म्हात्रे, विनय पाटील, राकेश म्हात्रे, रेश्मा माळी, अंजा माने, परेश पावसकर, अमिता घरत, अमिषा घरत, सुजित पाटील, प्रियांका म्हात्रे, माधुरी म्हात्रे, किशोर म्हात्रे, गणेश म्हात्रे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# पुनरागनाबद्दल शमीने सांगितला किस्सा

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या क्रिकेट वर्ल्डकपमध्ये भारताचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमीने भेदक मारा करीत अनेक सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांची दाणादाण उडवली होती. दरम्यान, मोहम्मद शमीने त्याच्यासोबत घडलेल्या घटनेबाबत एका घटनेचा उलगडा केला आहे.



नुकत्याच आटोपलेल्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने जबरदस्त कामगिरी केली. त्यात गोलंदाजीमध्ये मोहम्मद शमीने चमक दाखवली. शमीने त्याच्यासोबत घडलेल्या घटनेबाबत एका धक्कादायक घटनेचा उलगडा केला आहे. कारकिर्दीत एक वेळ अशी आली होती की, डॉक्टरांनी मला खेळण्यास मनाई केली होती, मला सातत्याने इंजेक्शन घ्यावी लागत होती, असे शमीने म्हटले आहे.

एका मुलाखतीमध्ये मोहम्मद शमीने याबाबत सांगितले. शमी म्हणाला की, २०१५च्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेपूर्वी काही दिवस आधी माझ्या गुडघ्यांमध्ये सूज आली होती. शस्त्रक्रिया करून घेणे हा माझ्यासमोरील शेवटचा पर्याय होता, मात्र मी शस्त्रक्रिया करून घेतली नाही आणि क्रिकेट खेळणे सुरू ठेवले. प्रत्येक सामन्यानंतर मला रुग्णालयात जाऊन इंजेक्शन घ्यावे लागत होते. मी वेदना झेलल्या आणि खेळत राहिलो. मी विश्रांती घेण्याऐवजी देशाची निवड केली.

नंतर शमीच्या गुडघ्यांवर शस्त्रक्रिया झाली. जेव्हा मला जाग आली तेव्हा मी डॉक्टरांना विचारले की, मी पुन्हा केव्हा खेळायला सुरुवात करू शकेन. त्यावर डॉक्टर म्हणाले की, क्रिकेट खेळणे दूर, आता तुला आरामात चालता आले तरी पुरेसे आहे. त्यानंतर सारे काही माझ्या रिकव्हरीवर अवलंबून होते, असे शमीने सांगितले.

# सानपाड्याच्या उत्तम मानेंचे ॲथलेटिक्समध्ये यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई सानपाडा येथे राहणारे ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक उत्तम माने यांनी नाशिक येथील मिनाताई ठाकरे स्टेडियममध्ये महाराष्ट्र मास्टर्स असोसिएशन आयोजित राज्यस्तरिय ॲथलेटिक्स स्पर्धेत यश मिळविले.



माने यांनी थाळीफेकमध्ये सुवर्ण, तर भालाफेकमध्ये रौप्यपदक जिंकले. या यशाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

दरम्यान, विविध क्रीडा स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल माने यांना मुंबईतील परळ भोईवाडा येथे राष्ट्रीय मिल मजदूर भवन सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज सोसायटीमार्फत डॉ. पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रसाद लाड, कवी-लेखक प्रवीण दवणे हे प्रमुख पाहुणे म्हणून तसेच संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील व संचालक मंडळ उपस्थित होते.

# 'झुंझार'च्या क्रिकेट स्पर्धेत प्रतीक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघ विजयी

## श्रेय पाटील ठरला सामनावीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै. मिलिंद चवरकर स्मृतीचषक ४० षटकांच्या एकदिवसीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यात प्रतीक क्रिकेट अकॅडमी संघाने जगदिश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघावर विजय मिळवला आहे.



प्रथम फलंदाजी स्विकारत पनवेल संघाने ४० षटकांमध्ये ६ गडी गमावत २२३ धावा धावफलकावर नोंदवल्या. सलामीचा तंत्रशुद्ध फलंदाज श्रेय पाटील यांनी ३६ धावा केल्या. मधल्या फळीत वेदांत बोंबले यांनी सुरेख खेळ करीत सर्वाधिक ६९ धावा केल्या. अलिबाग संघाकडून ओम भगत व स्मित पाटील यांनी सुरेख गोलंदाजी करत प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. प्रत्युत्तरात जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाचा मधल्या फळीतील फलंदाज अर्णव पाटील यांनी २३, सय्यद २१ तर तनिष्का वार्गे हिने १८ धावा काढल्या. अलिबाग संघाचा डाव सर्व फलंदाज बाद १३१ धावसंख्येवर संपला.

पनवेलकडून पार्थ जंगम ३ आर्य म्हात्रे आणि स्वरा जगताप हिने प्रत्येकी २ फलंदाज टिपले. सामन्याचा सामनावीर म्हणून यष्टीरक्षक फलंदाज श्रेय पाटील, स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू अर्णव पाटील, इमर्जिंग प्लेयर वेदांत बोंबले, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून आर्य म्हात्रे यांना झुंझारचे सचिव किशोर तावडे, अजय टेमकर, राजाराम जंगम, जगदीश ढगे, संदिप जोशी, ॲड. पंकज पंडित, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.




# गौतम गंभीरचे 'केकेआर'मध्ये पुनरागमन

## आयपीएलमध्ये बजावणार मार्गदर्शकाची भूमिका

**कोलकाता : वृत्तसंस्था**

भारताचा माजी सलामीवीर गौतम गंभीर कोलकाता नाईट रायडर्सचा मार्गदर्शक असेल. याआधी तो लखनऊ सुपर जायंट्स संघाच्या मेंटरची भूमिका बजावत होता. गंभीरने लखनऊ संघाचे मार्गदर्शकपद सोडले आहे.

आयपीएल २०२३ संपल्यानंतर गौतमने शाहरूख खानची भेट घेतली, ज्यानंतर तो त्या आयपीएल संघात सहभागी होऊ शकतो अशी अटकळ सुरू झाली होती ज्याला त्याने स्वतः एकेकाळी त्याच्या नेतृत्वाखाली आयपीएल चॅम्पियन बनवले होते. केकेआर सीईओ वेंकी म्हैसूर यांनी जाहीर केले की माजी भारतीय सलामीवीर गौतम गंभीर केकेआरमध्ये मार्गदर्शक म्हणून परत येईल आणि मुख्य प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांच्याबरोबर काम करेल.



लखनऊ सुपर जायंट्सचे मार्गदर्शकपद सोडल्यानंतर गौतम गंभीरने एक भावनिक संदेश शेअर केला आहे, ज्यामध्ये तो हे पद सोडताना खूप भावूक दिसत होता. आयपीएलच्या मागील दोन आवृत्त्यांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या लखनऊ सुपर जायंट्सला आयपीएल २०२४पूर्वी दोन मोठे धक्के बसले आहेत. मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांनी आधीच संघ सोडला होता. आता मार्गदर्शक गौतम गंभीरनेही आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. स्वतः गंभीरने ट्विटरवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली. आता तो कोलकाता नाईट रायडर्सचा नवा मार्गदर्शक बनला आहे. श्रेयस अय्यर केकेआरचा कर्णधार आहे.



**गौतम नेहमीच कुटुंबाचा एक भाग होता आणि सदैव राहील. आता आमचा कर्णधार एका वेगळ्या अवतारात एक मार्गदर्शक म्हणून संघात परतत आहे. त्याची उणीव सर्वांना जाणवली. तो येत असल्याने आम्ही सर्वजण उत्सुक आहोत. आम्हाला चंदू सर (चंद्रकांत पंडित), गौतम यांना टीम केकेआरला पुढे नेताना आणि संघात कधीही न मरणारा आत्मा आणि खिलाडूवृत्ती वाढवताना बघायचे आहे.**

**-शाहरूख खान, संघाचा सह-मालक**

## क्रिकेटपटू सिद्धार्थ म्हात्रेची महाराष्ट्र संघात निवड



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

उरणमधील हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांचे पुत्र सिद्धार्थ म्हात्रे याची विजय हजारे स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा राष्ट्रीय पातळीवरील ५० षटकांची भारतातील सर्वांत मोठी स्पर्धा आहे.

महाराष्ट्र संघाचे नेतृत्व भारताचा आंतरराष्ट्रीय खेळाडू केदार जाधव करीत असून ऋतुराज गायकवाड, अंकित बावणे, राजवर्धन हांगकर असे अनेक दिग्गज खेळाडू महाराष्ट्र संघात आहेत. या स्पर्धेला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे.

सिद्धार्थ म्हात्रे हा अष्टपैलू खेळाडू म्हणून संघात सहभागी झाला आहे. अष्टपैलूत्वासोबत तो दोन्ही हाताने गोलंदाजी करतो. अशी प्रतिभा मोजक्या खेळाडूंमध्ये आहे. सिद्धार्थ हा पुणे येथील पुनीत बालन व केदार जाधव अॅकॅडमीमध्ये प्रॅक्टिस करतो. निवडीबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचाचा वर्षाव होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com